रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १५५
www.ramprahar.com

◆ सोमवार, २२ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## भारत-जी राम-जी विधेयकावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी



**नवी दिल्ली :** विकसित भारत रोजगार हमी आणि आजीविका अभियान म्हणजचे भारत-जी राम-जी विधेयकावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वाक्षरी केली आहे. मनरेगा योजनेची जागा घेणारा हा कायदा एका आर्थिक वर्षात ग्रामीण भागतील प्रत्येक कुटुंबात १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देतो. मनरेगामध्ये १०० दिवसांच्या रोजगाराची हमी होती. नव्या विधेयकात पेरणी किंवा कापणीच्या हंगामात एकंदर ६० दिवसांचा कालावधी अधिसूचित करायचा अधिकार राज्यांना देण्यात आला आहे. गेल्या आठवड्यात संसदेच्या लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांनी हे विधेयक मंजूर केले होते. ग्रामीण भागात आत्मनिर्भरता, समृद्धी, सर्वसमावेशक विकास आणि सक्षमीकरण ही या कायद्याची उद्दिष्टे आहेत. हा कायदा ग्रामीण भारताच्या विकासातला मैलाचा दगड ठरेल, असे ग्रामविकास मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

### अंतरंग

नववर्षाच्या स्वागतासाठी फार्महाऊस गजबजणार/३
स्वच्छ हवेसाठी ज्येष्ठांसह तरुणाई एकवटली!/६
महिलांच्या मॅरेथॉनला पनवेलमध्ये प्रतिसाद/८

# राज्यातील नगरपालिकांमध्ये भाजप नंबर वन

## सर्वाधिक ठिकाणी नगराध्यक्ष विजयी

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्यातील २८८ नगर परिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीचा निकाल रविवारी (दि. २१) जाहीर झाला. या निवडणुकीत भाजपसह महायुतीचा मोठा विजय झाला आहे. तब्बल २००हून अधिक नगरपालिकांवर महायुतीने यश संपादन केले असून भाजपचे १००पेक्षा जास्त नगराध्यक्ष निवडून आले आहेत. निकालानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत महाराष्ट्राच भाजपच नंबर वन पक्ष असल्याचे म्हटले.**



माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र म्हणाले की, महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानतो. जनतेने भाजपला आणि आमच्या महायुतीला प्रचंड समर्थन दिले आहे. मी यापूर्वीच भाकीत केले होते निवडून येणाऱ्या एकूण नगराध्यक्षांपैकी ७५ टक्के नगराध्यक्ष हे महायुतीचे असतील. त्याच प्रकारचा कल राज्याच्या जनतेने दिला तसेच भाजपच प्रथम क्रमाकांचा पक्ष असल्याचे अधोरेखित झाले आहे. भाजपचे जवळपास १२९ नगराध्यक्ष निवडून आले आहेत, तर एकंदर महायुतीचे ७५ टक्के नगराध्यक्ष आहेत. (पान २ वर..)

**महाराष्ट्रातील जनतेने मतांचा कौल हा महायुतीला दिला आहे.**



**महायुतीला स्पष्ट असे बहुमत विधानसभेत मिळाले होते. त्यानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतदेखील महायुतीला कौल मिळाला. या निवडणुका कार्यकर्त्यांच्या होत्या. निकालाचा जो कल आहे, तो महायुतीला असल्याचे स्पष्ट झाले आहे. याबद्दल जनतेचे आभार मानावे तेवढे कमी आहेत.**
**-रवींद्र चव्हाण, भाजप प्रदेशाध्यक्ष**

## रायगडात संमिश्र निकाल; पेणमध्ये सलग दुसऱ्यांदा महायुतीच्या प्रितम पाटील नगराध्यक्षपदी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात १० नगर परिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल रविवारी (दि. २१) संमिश्र लागला. पेणमध्ये महायुतीच्या उमेदवार प्रितम पाटील दुसऱ्यांदा नगराध्यक्षपदी निवडून आल्या आहेत.

रायगडातील अलिबाग, पेण, मुरूड जंजिरा, रोहा, श्रीवर्धन, महाड, उरण, खोपोली, कर्जत, माथेरान या १० नगर परिषदांच्या नगराध्यक्षपदासाठी ३४, तर नगरसेवकपदासाठीच्या २०९ जागांकरिता ५७५ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. जिल्ह्यात १०७ प्रभागातून २१७ नगरसेवक निडून द्यायचे होते. त्यापैकी पेण नगर परिषदेत सहा, तर अलिबाग आणि रोह्यामध्ये प्रत्येकी असे एकूण आठ नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याने नगरसेवकपदाच्या २०९ जागांसाठी प्रत्यक्ष मतदान घेण्यात आले.



भाजपने पेणचा गड राखला असून महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रितम ललित पाटील या तब्बल ५८६२ मतांनी विजयी झाल्या आहेत. नगर परिषदेच्या निवडणुकीत एकूण २४पैकी सहा जागी महायुतीचे उमेदवार बिनविरोध विजयी झाल्याने उर्वरित १८ जागांसाठी मतदान झाले होते. त्यातही सर्वाधिक ११ जागी महायुतीचे उमेदवार निवडून आले. नगरविकास आघाडीने तीन, पेणकर आघाडीने दोन, तर शिवसेना शिंदे गट व शिवसेना उबाठा गट यांनी प्रत्येकी एक जागा जिंकली. या वेळी महायुतीने उमेदवारांची रॅली काढून जल्लोष केला. या रॅलीत विजयाचे शिल्पकार आमदार रविशेठ पाटील, नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी प्रतिक्रिया देताना आमदार रविशेठ पाटील म्हणाले की, गेल्या पाच वर्षात पेण शहरात न भूतो न भविष्यती अशी कामे झाली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहराला झुकते माप देऊन विकासकामाला निधी कमी पडू दिलेला नाही. महायुतीच्या उमेदवारांना मिळालेली मते केलेल्या विकासकामांची पोचपावती असून घोटाळेबाजांना मिळालेली ही चपराक आहे. सुज्ञ पेणकरांचे आभार!

नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांनी, पेणच्या जनतेने तिसऱ्यादा मला संधी दिली असून जनतेने दाखविलेल्या विश्वासाला कदापि तडा जाऊ देणार नाही. येणाऱ्या काळात पेणच्या गतिमान विकासासाठी आमदार रविशेठ पाटील, खासदार धैर्यशील पाटील व खासदार सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली कटिबद्ध राहू, अशी ग्वाही देत मतदारांना धन्यवाद दिले. (पान २ वर..)

### खोपोली

खोपोली नगर परिषद निवडणुकीत महायुतीचे कुलदीपक शेंडे (शिवसेना शिंदे गट) यांनी परिवर्तन आघाडीचे सुनील पाटील (राष्ट्रवादी अजित पवार गट) यांचा पराभव करीत नगराध्यक्षपदी विजय मिळविला. सदस्यपदामध्ये एकूण ३१पैकी शिवसेनेचेच सर्वाधिक १४, राष्ट्रवादी सात, भाजप आणि शेकाप प्रत्येकी चार, तर राष्ट्रवादी शरद पवार गट व अपक्ष प्रत्येकी एक असे उमेदवार निवडून आले आहेत. या नगरपालिकेवर राष्ट्रवादीची सत्ता होती. या वेळी ती महायुतीने खेचून घेतली आहे.

### उरण

उरण नगर परिषदेच्या निवडणुकीत सदस्यपदाच्या एकूण २१पैकी सर्वाधिक १२ जागी भाजप महायुतीने विजय साकारत स्पष्ट बहुमत मिळविले आहे, तर महाविकास आघाडीचे नऊ उमेदवार निवडून आले. नगराध्यक्षपदी आघाडीच्या भावना घाणेकर (राष्ट्रवादी शरद पवार गट) निवडून आल्या आहेत. दरम्यान, भाजप महायुतीच्या विजयी उमेदवारांचे आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## भगवद्गीता आपल्या संस्कृतीचा आत्मा -आमदार प्रशांत ठाकूर

### स्पर्धेचे पारितोषिक वितरण; समीरा गुजर-जोशी यांचे प्रकट व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रीमद्भगवद्गीतेत केवळ धार्मिक उपदेश नाही, तर जीवन जगण्याची कला सांगितलेली आहे. कर्तव्य, कर्मयोग, भक्तीयोग आणि ज्ञानयोग यांचा सुंदर समतोल गीतेत दिसतो. कर्तव्य करताना फलाची अपेक्षा न ठेवणे, धैर्याने संकटांना सामोरे जाणे आणि स्वतःचा धर्म ओळखणे हे संदेश आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यामुळे भगवद्गीता आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. २१) येथे केले.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष पनवेल तालुका, संस्कार भारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल यांच्या वतीने श्रीगुरुकुलम् न्यासतर्फे सप्टेंबर महिन्यात श्री विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे श्रीमद्भगवद्गीता पाठ महायज्ञ झाला. या



संस्कारमय कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्रीमद्भगवद्गीता पठण स्पर्धेची घोषणा आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. विशेष म्हणजे पनवेलमध्ये प्रथमच आयोजन करण्यात आलेल्या या स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आणि समीरा गुजर-जोशी यांचे प्रकट व्याख्यान गोखले सभागृहात झाले. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. (पान २ वर..)

## हुडहुडी वाढली! निफाड @ ४.५

**नाशिक : प्रतिनिधी**

उत्तर भारतातून येणाऱ्या शीतलहरींमुळे महाराष्ट्रात थंडीचा कडाका जाणवत असून नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात हंगामातील नीचांकी ४.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

राज्यात थंडीचे प्रमाण अधिक असलेल्या भागात पहाटेच्या सुमारास पसरलेले दाट धुके आणि बोचऱ्या वाऱ्यांमुळे जनजीवन विस्कळीत होत आहे. सकाळच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट असतो, तर बाजारपेठाही उशिरा सुरू होतात. कामावर जाणारे मजूर आणि दुचाकीस्वारांना या थंडीचा मोठा फटका बसतोय. थंडीपासून बचावासाठी नागरिक उबदार कपड्यांचा आधार घेत असून ठिकठिकाणी शेकोट्या पेटवल्या जात जात आहेत.

थंडीचा जोर वाढल्याने सर्दी, खोकला, तापाचे रुग्ण वाढत आहेत. आरोग्य विभागाने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनाचे विकार असलेल्या व्यक्तींनी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. पुढील काही दिवस थंडीचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे

## रामबाग उद्यानाचा आज वर्धापन दिन सोहळा

### सांस्कृतिक कार्यक्रम रंगणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दुबईतील मिरॅकल गार्डनच्या धर्तीवर पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथील श्री म्हसेश्वर मंदिर परिसरात साकारलेल्या रामबाग या निसर्गरम्य उद्यानाच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त सोमवारी (दि. २२) श्री सत्यनारायणाची महापूजा आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने या वेळी त्यांचा विशेष सत्कार केला जाणार आहे.



या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी मंत्री व आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर टाकणारी आणि स्वर्गसुख आनंद देणारी रामबाग १४ एकर जागेत आहे. (पान २ वर..)






# श्रीवर्धन पालिकेत राष्ट्रवादीचे १५, शिंदे गटाचे तीन, तर भाजपचे दोन नगरसेवक विजयी

## ■ नगराध्यक्षपदी ‘उबाठा’चे ॲड.अतुल चौगुले

**श्रीवर्धन : बातमीदार , प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगर परिषदेमध्ये नाट्यमय परिस्थिती निर्माण झाली आहे. सर्वांचे अंदाज फोल ठरवत श्रीवर्धन नगर परिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या १५ जागा निवडून आलेल्या असल्या तरीही थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीमध्ये उबाठाचे ॲड. अतुल चौगुले यांनी २१९ मतांनी विजय संपादन केला आहे. यावेळी राष्ट्रवादी व भारतीय जनता पार्टी यांची युती असल्यामुळे बरेच वर्षाच्या कालावधीनंतर भारतीय जनता पार्टीचे दोन नगरसेवक श्रीवर्धन नगरपरिषदेवरती निवडून आले आहेत. सुप्रिया चौगुले व प्रणिल बोरकर यांनी भाजपाचे अनेक वर्षानंतर नगरसेवक होण्याचा मान मिळवला आहे.

शिवसेना शिंदे गटाकडून देवेंद्र भूसाणे, सलोनी मोहित-भगत व माजी शहर प्रमुख संतोष तथा पिंट्या वेशवीकर यांनी विजय संपादन केला आहे. शिवसेना उबाठा कडून ॲड. अतुल चौगुले हे विजयी झाल्यानंतर राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत शेठ गोगावले यांनी श्रीवर्धन येथे येऊन अतुल चौगुले यांचे विशेष अभिनंदन केले. त्यानंतर विविध प्रसार माध्यमांवरती ॲड. अतुल चौगुले शिंदे गटामध्ये प्रवेश करणार याबाबत वृत्त प्रसिद्ध करण्यात येत होते. परंतु अद्याप अशी कोणत्याही प्रकारची अधिकृत घोषणा झाल्याची माहिती शिवसेना उबाठा कडून प्राप्त झालेली नाही.

२००९ साली रायगडचे विद्यमान खासदार सुनील तटकरे हे श्रीवर्धन मतदारसंघातून आमदार निवडून आल्यानंतर राज्यामध्ये कॅबिनेट मंत्री होते. तसेच राज्याचे अर्थमंत्री होते. तेव्हापासून सातत्याने श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघांमध्ये व श्रीवर्धन शहरासाठी विविध प्रकारचा विकास निधी आणण्यात आला. त्यामुळे या वेळच्या नगरपरिषद निवडणुकीत थेट नगराध्यक्षाचा उमेदवार देखील राष्ट्रवादी काँग्रेसचाच निवडून येईल व राष्ट्रवादी काँग्रेसची एक हाती सत्ता स्थापन होईल. अशी आशा राष्ट्रवादीच्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना होती.

परंतु राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक बहुतेक ठिकाणी निवडून आले. परंतु त्याच प्रभागांमधून क्रॉस वोटिंग झाल्यामुळे अतुल चौगुले यांचा विजय झाल्याचे बोलले जात आहे. तसेच येत्या आगामी चार ते पाच दिवसांमध्ये अतुल चौगुले हे देखील शिवसेना शिंदे गटामध्ये अधिकृत प्रवेश करतील. अशा प्रकारच्या चर्चा देखील विविध स्तरावरून ऐकायला मिळत आहेत. एकूणच श्रीवर्धन नगर परिषदेचा निकाल हा नाट्यमय रित्या लागलेला असून आता पुढे काय होते? याविषयी श्रीवर्धनच्या नागरिकांना मोठी उत्सुकता लागून राहिलेली आहे.



### नगराध्यक्ष चौगुले आमच्यासोबत -मंत्री गोगावले

***राज्याचे जलसंपदा मंत्री भरतशेठ गोगावले यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे नवनिर्वाचित नगराध्यक्ष अतुल अरविंद चौगुले यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी मंत्री गोगावले म्हणाले की, अतुल चौगुले आमच्यासोबत आहेत आणि आम्ही त्यांच्यासोबत आहोत; त्यांच्या विजयामागे आमचे सहकार्य राहिले आहे.भविष्यात श्रीवर्धनच्या विकासासाठी नवे उपक्रम व नवी कामे पाहायला मिळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राजकारणापेक्षा लोकांच्या हिताचा विकास हा केंद्रबिंदू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. जनतेच्या विकासासाठी आम्ही नेहमीच पुढे असू, असा ठाम संदेश मंत्री गोगावले यांनी दिला.***

# मुरूड नगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या आराधना दांडेकर

## शिंदेसेनेचे १२, राष्ट्रवादी-‘उबाठा’चे आठ नगरसेवक

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड नगरपरिषदेची निवडणूक अतिशय चुरशीची झाली असून थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आराधना मंगेश दांडेकर यांचा २४६ मतांनी मोठा विजय झाला आहे.शिवसेनेच्या माजी नगराध्यक्षा कल्पना संदीप पाटील यांच्या सोबत हि लढत अत्यन्त चुरशीशी होऊन आराधना दांडेकर २४६ मतांनी विजयी झाल्या आहेत.तर शिवसेनेचे सर्वाधिक १२ नगरसेवक तर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे चार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे चार नगरसेवक निवडून आले आहेत.

मुरुड शहरातील नागरिकांनी शिवसेनेला मोठे संख्याबळ प्राप्त करून दिले असले तरी थेट नगराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा झाल्याने मुरुड नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे वर्चस्व निर्माण झाले आहे. शिवसेनेच्या ताब्यात असलेली नगरपरिषद राष्ट्रवादी काँग्रेस कडे गेली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मुरुड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन मनोज भगत यांची बहीण प्रीता चौलकर,प्रमिला माळी,तमिम धाकम व प्रांजली मकू या विजयी झाल्या आहेत.

मुरुड नगरपरिषद निवडणुकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे दोन्ही सखे भाऊ व बहीण वेगवगेळ्या प्रभागातून निवडून आलेले आहेत.श्रद्धा चंद्रकांत अपराध व आदेश दांडेकर हे निवडून आले आहेत.उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे रुपेश पाटील,देवयानी गुरव हे विजयी झाले आहेत.तर शिवसेनेचे रुपेश रणदिवे,वीरेंद्र भगत,नितीन आंबुर्ले,यास्मिन कादरी,नागमना खांजादे,मनीष वीरकुड,विजय पाटील,पांडुरंग आरेकर,काँग्रेस आय पक्षाच्या सुगंधा मकू,वैदही आरेकर,श्रीकांत खोत,अंकिता गुरव हे बारा उमेदवार शिवसेनेचे विजयी झाले आहेत.



### मुरुड शहरासाठी केंद्र व राज्याचा निधी वळवणार

मुरुड नगरपरिषदेचा निकाल जाहीर होताच येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीस मोठे यश प्राप्त झाले आहे.थेट नगराध्यक्ष पदी आराधना दांडेकर व उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे चार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे चार नगरसेवक निवडून आल्याचे समजताच खासदार सुनील तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी मुरुड मध्ये येऊन सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले आहे.यावेळी त्यांनी थेट नगराध्यक्ष आराधना दांडेकर याना खासदार तटकरे यांनी पुष्पगुछ देऊन त्यांचे खास अभिनंदन केले.

यावेळी उपस्थित लोकांना मार्गदर्शन करताना खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले कि,मुरुड शहरातील जनता सुद्न्य व हुशार असून सत्ता त्यांनी टीका करणार्यांना वगळून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडे दिली आहे,आमचे दायित्व आहे कि, मुरुड शहराच्या विकासासाठी राज्य व केंद्र शासनाचा निधी वळवून मुरुड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहणार आहोत.

लवकरच पर्यटन महोत्सव साजरा करणार असून यासाठी लोकांना लुभावणारे कार्यक्रम आम्ही देणार आहोत.मुरुड नगरपरिषदेत १२ व आठ चे गणित असले तरी आम्ही आमच्या कार्यकुशलतेवर कारभार चालवणार आहोत.मुरुड च्या जनतेने राष्ट्रवादी काँग्रेस वर जो विश्वास टाकला आहे.त्याला योग्य न्याय मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न असेल

पान १ वरुन

## रायगडात संमिश्र निकाल

### कर्जत

कर्जत नगर परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी आणि इतर मित्र पक्षांच्या कर्जत परिवर्तन विकास आघाडीच्या उमेदवार पुष्पा हरिश्चंद्र दगडे (राष्ट्रवादी) नगराध्यक्ष बनल्या आहेत. त्याचप्रमाणे या आघाडीचे २१पैकी सर्वाधिक १३ (एक आघाडी पुरस्कृत अपक्ष) उमेदवार निवडून आले आहेत. दुसरीकडे प्रतिस्पर्धी भाजप, शिवसेना शिंदे गट आणि आरपीआय यांच्या महायुतीला आठ जागी यश आले.

कर्जत परिवर्तन विकास आघाडीत राष्ट्रवादीचे आठ, शिवसेना उबाठाचे चार आणि एक आघाडी पुरस्कृत अपक्ष असे १३ उमेदवार निवडून आले आहेत, तर महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गटाचे सात आणि एक भाजप उमेदवाराने विजय संपादन केला आहे.

### माथेरान

गिरीस्थान नगर परिषद असलेल्या माथेरानमध्ये महायुतीने प्रतिस्पर्धी शिवराष्ट्र पॅनलचा धुव्वा उडवला आहे. महायुतीचे एकूण २०पैकी १५ उमेदवार विजयी झाले असून थेट नगराध्यक्षपदाचे महायुतीचे उमेदवार चंद्रकांत चौधरी (शिवसेना शिंदे गट) यांनी शिवराष्ट्र पॅनलचे अजय सावंत यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला.

महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गटाने १२, तर भाजपने तीन जागा जिंकल्या. दुसरीकडे शिवराष्ट्र पॅनलला पाच जागांवर समाधान मानावे लागले. यात राष्ट्रवादी अजित पवार गटाला चार, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या पदरी एक जागा आली.

### अलिबाग

अलिबाग नगर परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीने सत्ता मिळविली असून शेकापच्या अक्षया प्रशांत नाईक नगराध्यक्षपदी निवडून आल्या आहेत. त्यांचे वडील प्रशांत नाईक यांची बिनविरोध निवड झाली होती.

सदस्यपदाच्या एकूण २०पैकी एक जागा बिनविरोध झाल्याने १९ जागांसाठी निवडणूक झाली. यापूवी झालेल्या निवडणुकांमध्ये शेकापने सर्व जागा जिंकल्या होत्या. या वेळी मात्र त्यांना धक्का बसला आहे. विरोधकांचे तीन नगरसेवक जिंकून आले आहेत. स्वबळावर निवडणूक लढवणारे शिवसेना ठाकरे गटाचे संदीप पालकर आणि त्यांची पत्नी श्वेता संदीप पालकर हे दोघे प्रभाग क्रमांक ६मधून निवडून आले तसेच भाजप-शिवसेना शिंदे गट युतीचे ॲड. अंकित बंगेरा प्रभाग क्रमांक ७ ब मधून विजयी झाले. त्यामुळे अलिबाग नगरपालिकेत आता विरोधकांनी प्रवेश केला आहे.

### मुरूड

मुरूड नगर परिषदेच्या थेट नगराध्यक्षपदी आघाडीच्या आराधना दांडेकर (राष्ट्रवादी अजित पवार गट) विजयी झाल्या आहेत. दुसरीकडे सदस्यपदाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे एकूण २०पैकी सर्वाधिक १२ उमेदवार निवडून आले आहेत. याखेरिज राष्ट्रवादी-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आघाडीचे प्रत्येकी चार उमेदवार निवडून आले आहेत.

### रोहा

रोहा अष्टमी नगर परिषदेवर राष्ट्रवादी पक्षाचे वर्चस्व कायम राहिले आहे. येथे थेट नगराध्यक्षपदी राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या वनश्री समीर शेडगे विजयी झाल्या.

सदस्यपदपदासाठी राष्ट्रवादीचे उमेदवार राजेंद्र जैन बिनविरोध निवडून आल्याने एकूण २०पैकी उर्वरित १९ जागांसाठी लढत झाली. यामध्ये राष्ट्रवादीच्या १७ उमेदवारांनी विजय मिळविला, तर भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या प्रत्येकी एका उमेदवाराने बाजी मारली.

### श्रीवर्धन

श्रीवर्धन नगर परिषद रणसंग्रामात थेट नगराध्यक्षपदी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे ॲड.अतुल चौगुले विजयी झाले, तर सदस्यपदाच्या एकूण २० जागांपैकी सर्वाधिक १५ जागी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार विजयी झाले आहेत. याशिवाय भाजपचे दोन, तर शिवसेना शिंदे गटाच्या तीन जणांनी यश मिळविले.

दरम्यान, मंत्री भरत गोगावले यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष अतुल चौगुले यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. या वेळी त्यांनी, चौगुले आमच्यासोबत आहेत आणि त्यांच्या विजयामागे आमचे सहकार्य राहिले आहे, असे सांगितले. त्यामुळे चौगुले लवकरच शिवसेना शिंदे गटात प्रवेश करतील अशी चर्चा आहे.

### महाड

महाड नगर परिषद निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे सुनील कविस्कर यांनी नगराध्यक्षपदी विजय मिळवला आहे. त्यामुळे येथील नगरपालिकेवर शिंदे गटाचे वर्चस्व प्रस्थापित झाले असले तरी नगरसेवक संख्येमध्ये भाजप-राष्ट्रवादी युतीने बाजी मारत एकूण २०पैकी सर्वाधिक १२ जागी विजय संपादन केला आहे. शिंदे गटाने आठ जागा जिंकल्या. दरम्यान, पंचवीस वर्षानंतर भाजपला महाड नगरपलिका सभागृहात जाण्याची संधी मिळाली आहे. भाजपचे दोन सदस्य निवडून आले आहेत.

## राज्यातील नगरपालिकांमध्ये भाजप नंबर वन

नगरसेवकांच्या बाबतीत भाजपने यावेळी विक्रम केला, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. आकडेवारी देताना ते म्हणाले, २०१७ साली आमचे १६०२ नगरसेवक होते. आता त्याच्या दुपटीने जास्त म्हणजे सुमारे ३३२५ नगरसेवक निवडून आले आहेत. नगरसेवकांच्या संख्येमध्ये एकट्या भाजपचे ४८ टक्के नगरसेवक आहेत. प्रचंड मोठे जनसमर्थन आम्हाला मिळाले आहे. आमचे सहयोगी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचेही अभिनंदन करतो. त्यांच्याही पक्षाने चांगली कामगिरी केली आहे.

विधानसभेच्या कामगिरीची यानिमित्ताने पुनरावृत्ती झाली आहे. आमचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची ही पहिलीच निवडणूक होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाला घवघवीत यश मिळाले आहे. त्यामुळे त्यांचेही अभिनंदन करतो. माजी अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर नेत्यांनी योग्य असा समन्वय राखला. त्यामुळे आमचा २०१७ पेक्षाही मोठा विजय मिळाला आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

## भगवद्गीता आपल्या संस्कृतीचा आत्मा -आमदार प्रशांत ठाकूर

या कार्यक्रमास प्रमुख वक्ता सुप्रसिद्ध अभिनेत्री व सूत्रसंचालिका समीरा गुजर-जोशी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक अजय बहिरा, राजू सोनी, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका प्रिती जॉर्ज, सुलक्षणा टिळक, संस्कृत भारतीच्या अनया करंदीकर, निलांबरी जोशी, जुई चव्हाण, गुरुकुलम न्यास अध्यक्ष मंजिरी फडके, ॲड. अमित चव्हाण, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, रूपेश नागवेकर, प्रितम म्हात्रे, विनायक मुंबईकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चा शहराध्यक्ष हिमेश बहिरा यांच्यासह विद्यार्थी, युवा, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी भगवद्गीतेचे महत्त्व आपल्या भाषणातून मांडले. संस्कृत भाषा ज्ञानाची आणि संस्कृतीची आहे. आपल्या देशातील भाषा आणि साहित्य देशाचे वैभव आहे, त्या अनुषंगाने आपली संस्कृती वृद्धिंगत होत राहणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असे नमूद करून भगवद्गीतेचे ज्ञान जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचावे हा मूळ उद्देश या स्पर्धेचे होता हे त्यांनी अधोरेखित केले. या स्पर्धेला मिळालेला प्रतिसाद ऊर्जा देणारा आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी भाजप पनवेल तालुका, संस्कार भारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल आणि श्री गुरुकुलम न्यास यांनी विशेष मेहनत घेतली असल्याचे नमूद करून यापुढेही ही स्पर्धा अखंडपणे सुरू राहिली पाहिजे यासाठी आपण सारे कायम प्रयत्नशील राहू या, असे आवाहन त्यांनी केले तसेच आयोजन समितीमधील सर्वांना त्यांनी धन्यवाद दिले.

**भारत बुद्धी, ज्ञान आणि मूल्यांचा देश : समीरा गुजर-जोशी**

या वेळी वक्ता म्हणून बोलताना समीरा गुजर-जोशी यांनी म्हटले की, आपली संस्कृती ही आपल्या ओळखीचा आत्मा आहे आणि ती कधीही विसरता कामा नये. भारत हा बुद्धी, ज्ञान आणि मूल्यांचा देश असून येथे शब्दांचे उच्चार, त्यांचा अर्थ आणि विचारांना विशेष महत्त्व दिले जाते. भारतीय संस्कृती जगभरात तिच्या महान परंपरा, तत्त्वज्ञान आणि जीवन मूल्यांमुळे ओळखली जाते. यशस्वी, संतुलित आणि अर्थपूर्ण जीवनासाठी भगवद्गीतेचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या या स्पर्धेच्या आयोजनाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार व्यक्त केले. समीरा गुजर-जोशी यांनी, भगवद्गीतेत सांगितलेला कर्मसिद्धांत माणसाला कर्तव्यनिष्ठ राहून फळाची अपेक्षा न करता कार्य करण्याची प्रेरणा देतो. हा सिद्धांत व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास आणि जीवनातील यशासाठी दिशादर्शक ठरतो. भारतीय संस्कृतीचे जतन आणि भगवद्गीतेतील विचारांचा अंगीकार केल्यास समाज अधिक सुसंस्कृत, विचारशील आणि मूल्याधिष्ठित बनेल, असे सांगून जो घटक संपूर्ण समाजाला एकत्र बांधून ठेवतो, मूल्ये, नैतिकता आणि एकोप्याची भावना निर्माण करतो, त्याला खऱ्या अर्थाने धर्म म्हणता येते, असे नमूद केले. या वेळी त्यांनी साने गुरूजी, विनोबा भावे, बहिणाबाई यांची उदाहरणे देत भावी व युवा पिढीला सरळ सोप्या भाषेत संवादातून मार्गदर्शन केले

**विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे**

खुला गट - प्रथम क्रमांक श्रुती संदीप वीरकर, द्वितीय नीता लक्ष्मण भुजबळ आणि निवेदिता मधुकर नाईक, तृतीय शैला शरदराव कन्नडकर; शालेय गट इयत्ता तिसरी व चौथी - प्रथम भाविका ओमकार कुलकर्णी, द्वितीय साई तुळशीराम गांडाळ, तृतीय शिवम निवास डांगरकर; इयत्ता पाचवी ते सातवी - प्रथम राधा अंबरीश सहस्रबुद्धे, द्वितीय अथश्री जोशी, तृतीय ईश्वरी कट्टी; इयत्ता आठवी ते दहावी - प्रथम परिभूषण कुलकर्णी, द्वितीय आभा टिळक, तृतीय विद्यारण्य सचिन गोंधळी.

खुला गटातील प्रथम क्रमांक विजेत्या स्पर्धकास २१ हजार रुपये, द्वितीय १८ हजार रुपये आणि तृतीय १५ हजार रुपये; शालेय गटातील इयत्ता तिसरी व चौथीमधील प्रथम क्रमांकास पाच हजार रुपये, द्वितीय तीन हजार रुपये, तृतीय दोन हजार रुपये; इयत्ता पाचवी ते सातवीमधील प्रथम क्रमांकास ११ हजार रुपये, द्वितीय आठ हजार, तृतीय पाच हजार रुपये; तर इयत्ता आठवी ते दहावीतील प्रथम क्रमांकास १५ हजार रुपये, द्वितीय ११ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकाला आठ हजार रुपये असे बक्षिसांचे स्वरूप होते. त्याचबरोबर प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र तसेच विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

## रामबाग उद्यानाचा आज वर्धापन दिन सोहळा

या उद्यानात भव्य आणि सुरेख प्रवेशद्वार, निसर्गरम्य हिरवळीसह फुलझाडांच्या विविध रचना, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, लहान मुलांसाठी खेळणी, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन सेल्फी पॉईंट, मचवा, पाण्याचे कारंजे अशा सर्व बाबी आकर्षक आणि मनमोहक आहेत. सायकांळी या उद्यानाचे रूप बदलते. त्या वेळी तेथील विद्युत रोषणाई डोळ्यांचे पारणे फेडते. त्यामुळे राज्यातील निसर्गप्रेमी या ठिकाणी मोठ्या संख्येने भेट देत आहेत.

रामबाग उद्यानाच्या वर्धापन दिनानिमित्त सोमवारी सायंकाळी ५.३० वाजता श्री सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद, तर रात्री ८ वाजता पप्पू सूर्यराव, स्टेप आर्ट इंटरटेन्मेन्ट निर्मित आणि सनी संते प्रस्तुत 'हिच खरी आगरी कोळ्यांची दौलत' हा पारंपरिक लोकगीते व कोळीगीतांचा बहारदार कार्यक्रम होणार असून प्रवेश विनामूल्य आहे. या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर, श्री म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी.एल. ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील यांनी केले आहे.

# महाड प्रकरणातील सर्वांचे अटकपूर्व जामीन फेटाळले

**महाड : रामप्रहर वृत्त**

महाड नगर परिषदेच्या निवडणुकीदरम्यान २ डिसेंबरला झालेल्या शाळा क्रमांक पाच येथे असलेल्या प्रभाग दोन व तीन मतदान केंद्राबाहेरील रस्त्यावर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या हाणामारी संदर्भात संबंधित दोन्ही गटातील म्हणजेच विकास गोगावले, सुशांत जाभरेसह एकुण २९ आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज माणगाव कोर्टाने फेटाळल्याची माहिती माणगाव न्यायालयातील सरकारी वकील जितेंद्र म्हात्रे यांनी दिली आहे.

या संदर्भात दोन्ही गटांविरोधात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या पार्श्वभूमीवर माणगावच्या जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायाधीशांकडे आज या संदर्भात झालेल्या सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षाची बाजू ऐकून घेतल्यानंतर सरकारी वकील आणि केलेल्या युक्तिवाद विचारात घेऊन सत्र न्यायाधीश एस.टी. भालेराव यांनी दोन्ही गटातील आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळत असल्याचे जाहीर केले.

यासंदर्भात सरकारी वकील जितेंद्र म्हात्रे यांच्याशी प्रस्तुत प्रतिनिधीने सुनावणी संदर्भात विचारणा केली असता त्यांनी आपण सत्र न्यायाधीशांसमोर केलेला युक्तिवादामध्ये सदरचा गुन्हा प्राथमिक तपासासाठी घेण्यात आला असल्याचे सांगितले. शिवाय सर्व आरोपी फरार असल्याचे नमूद केले. सुप्रीम कोर्टाचे या संदर्भात असलेले निर्देश न्यायाधीशांसमोर ठेवून न्यायालयापासून संबंधित आरोपी दूर असून यामुळे समाजात चुकीचा संदेश जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# नवी मुंबईत भाजप, शिंदे गट युतीच्या चर्चेला सुरुवात

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे आणि नवी मुंबई महापालिकेतील भाजप, शिंदेची शिवसेना पक्षाच्या कार्यकर्त्यांनी युती नकोच, असा आग्रह धरला असला तरी, वरिष्ठ नेत्यांच्या आदेशानंतर अखेर ठाणे शहरापाठोपाठ नवी मुंबईतील दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी शनिवारी एकत्रित बैठक घेऊन युतीतील जागा वाटपाच्या प्राथमिक बोलणीला सुरूवात झाली.

यामुळे नवी मुंबईतही युती होणार असल्याचे आता जवळपास निश्चित मानले जात आहे.नवी मुंबई महापालिकेत नगरसेवकांची एकूण संख्या १११ इतकी आहे. त्यापैकी ६० नगरसेवक हे भाजपकडे आहेत तर, ५२ ते ५४ नगरसेवक शिवसेना (शिंदे गट) पक्षाकडे आहेत. त्यामुळे शिवसेनेकडून ५० टक्के जागा देण्याची मागणी होत असून या प्रस्तावावरच बैठकीत प्राथमिक चर्चा झाल्याचे खा. म्हस्के यांनी सांगितले. या बैठकीत शिवसेनेकडून खा. नरेश म्हस्के, उपनेते विजय नाहटा, जिल्हाप्रमुख किशोर पाटकर उपस्थित होते. तर भाजपकडून आ. विक्रांत पाटील,जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, निलेश म्हात्रे, रामचंद्र घरत, अनंत सुतार, दशरथ भगत उपस्थित होते.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून होणार रस्त्यांची कामे

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून आणि प्रयत्नांमुळे अर्थसंकल्पीय निधीतून प्रबळगडाकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी भरघोस निधी मंजूर झाला आहे. या निधीतून होणाऱ्या ठाकूरवाडी ते माची प्रबळगड रस्त्याचे काँक्रिटीकरण आणि ठाकूरवाडी गावांतर्गत रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन रविवारी मोठ्या उत्साहात झाले. भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला.

प्रबळगड हा ऐतिहासिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा किल्ला आहे, मात्र पायथ्यापासून माचीपर्यंतचा रस्ता खडतर असल्याने पर्यटकांना आणि स्थानिक ग्रामस्थांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या समस्येची दखल घेत शासनाकडून यासाठी मोठा निधी मिळवून दिला आहे. या कामामुळे ठाकूरवाडी ते माची प्रबळगड रस्त्याचे काँक्रिटीकरण केले जाणार असून गावातील अंतर्गत रस्त्यांचेही नूतनीकरण करण्यात येणार आहे.

भूमिपूजनावेळी अरुणशेठ भगत म्हणाले की, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल विधानसभा मतदारसंघाचा कायापालट होत आहे. ग्रामीण भागातील रस्ते दर्जेदार व्हावे ही त्यांची भूमिका असून आज सुरू झालेल्या या कामामुळे प्रबळगडावर येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढेल असे ते म्हणाले. या विकासकामांच्या शुभारंभावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, भाजप नेते संजय पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, सुनील पाटील, सतीश मालुसरे, सतीश पाटील, अतुल घरत, रवी शेळके, योगेश लहाने,सरपंच राम भवर, बाळू भूतांबरा, उपसरपंच दिनेश पाटील, सदस्य संगीत भूतांबरा, सतीश पाटील, जितेंद्र बदाले, सदस्य जितेंद्र बताले, हेमंत तांडेल, अनंता पवार, पांडुरंग वारगडा, पांडुरंग पारधी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

रस्ते कामामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले आहेत.

# उरण नगर परिषद निवडणुकीत भाजपचे १२ नगरसेवक विजयी

**● महाविकास आघाडीला नऊ जागा**





**उरण : प्रतिनिधी**

उरण नगर परिषदेच्या झालेल्या नगराध्यक्ष व १० प्रभागातील नगरसेवकांच्या २१ जागांसाठी पार पडलेल्या निकालाची उच्छुकता सर्वांनाचा लागली होती. रविवारी २१ डिसेंबर रोजी झालेल्या उरण नगरपरिषदेच्या मतमोजणीत नगराध्यक्षपदी महाविकास आघाडीच्या भावना घाणेकर या एक हजार ४७० मतांच्या फरकांनी विजयी झाल्या आहेत. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नागराध्यक्षपदाच्या उमेदवार भावना घाणेकर यांना नऊ हजार २१० मते, तर भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या पराभूत उमेदवार शोभा शाह–कोळी यांना सात हजार ७४० मते मिळाली आहेत. याशिवाय शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार रुपाली ठाकूर यांना अवघी ५९३ मते मिळाली आहेत.

याचप्रमाणे उरण नगर परिषदेच्या एकूण २१ नगरसेवकांपैकी भाजपला १२ तर महाविकास आघाडीने नऊ जागा जिंकल्या आहेत. प्रभाग क्रमांक १ अ मधून भाजपच्या रजनी सुनिल कोळी (विजयी)१ ब मधून भाजपचे जविन्द्र लक्ष्मण कोळी (विजयी)प्रभाग क्रमांक २ अ रिबेका रवींद्र मढवी (विजयी)२ ब मधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेचे विक्रम राजेंद्र म्हात्रे (विजयी)३ अ मधून ठाकरे गटाच्या वंदना विजय पवार (विजयी) ३ ब मधून ठाकरे गटाचे अमित हरिश्चंद्र म्हात्रे (विजयी)४ अ मधून ठाकरे गटाचे अतुल सुरेश ठाकूर (विजयी) ४ ब मधून ठाकरे गटाच्या प्रमिला संतोष पवार (विजयी)५ अ मधून काँग्रेसच्या नाहिदा ठाकूर (विजयी) ५ ब मधून भाजपचे जसीम इस्माईल गॅस (विजयी) ६ अ मधून ठाकरे गटाचे मंगेश लक्ष्मण कासारे (विजयी),६ ब मधून ठाकरे गटाच्या तनीषा सागर पाटील (विजयी),७ अ मधून राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या प्रार्थना चेतन म्हात्रे (विजयी) ७ ब मधून भाजपाचे रवी यशवंत भोईर (विजयी) ८ अ भाजपच्या पूर्वा योगेश वैवडे (विजयी) ८ ब भाजपचे ॲड. रोहित नितीन पाटील (विजयी) ९अ भाजपचे गणेश सदाशिव पाटील(विजयी) ९ ब भाजपच्या सायली विशाल पाटेकर (विजयी),१० अ भाजप राजेश मधुकर ठाकूर (विजयी),१० ब भाजपच्या सायली सविन म्हात्रे (विजयी),१० क मधून भाजपच्या दमयंती वैभव म्हात्रे (विजयी) झाल्या आहेत.

# कचरा व्यवस्थापनावर जनजागृतीपर स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने कळंबोली येथील के.एल.ई. महाविद्यालयांमध्ये मध्ये माझी वसुंधरा ६.० उपक्रमांतर्गत कचरा व्यवस्थापन या विषयावर नुकतेच जनजागृतीपर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकासाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, लघुपट प्रदर्शन तसेच परिसंवाद आयोजित करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या सर्व स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवित कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व, कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर व पुनर्चक्रण याबाबत आपले विचार प्रभावीपणे मांडले.

या वेळी लघुपट प्रदर्शनातून पर्यावरण रक्षणाचा संदेश प्रभावी पद्धतीने देण्यात आला. तसेच कचरा व्यवस्थापनातील आधुनिक उपाययोजना व भविष्यातील आव्हाने यावर विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सवयी अंगीकारण्याची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने माझी वसुंधरा ६.० अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वच्छ व हरित पर्यावरणाच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने शालेय व महाविद्यालयीन स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

# लोकसंत गाडगेबाबा पुण्यतिथींनिमित्त गव्हाण विद्यालयात स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या आचरणातून स्वच्छतेचा महामंत्र देणारे महान कर्मयोगी लोकप्रबोधनकार लोकसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शनिवारी (दि.२०) ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, पालक प्रतिनिधी साईनाथ मोकल आणि सर्व शिक्षक वृंदाने लोकसंत गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. सर्व विद्यार्थ्यांनी 'गोपाळा गोपाळा,देवकी नंदन गोपाळा' या लोकसंत गाडगे बाबांच्या सुप्रसिद्ध भजनाचे गायन केले.

वर्षभरासाठी प्रत्येक वर्गातील स्वच्छता दूत म्हणून नेमणूक केलेल्या विद्यार्थ्यांनी कोपर गावातील प्रसिध्द हनुमान मंदिर व मंदिरा सभोवतालच्या परिसराची स्वच्छता केली. हाती खराटे झाडू घेवून विद्यार्थ्यांनी या स्वच्छता अभियानात उत्साहाने सहभागी होवून स्वच्छता केली.

या ग्रामस्वचछता अभियानातील उल्लेखनीय बाब म्हणजे कोपर गावातील पुरूष व महिला ग्रामस्थांचा अभियानातील उत्स्फूर्त सहभाग. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते सुधीर ठाकूर, कोपरगावचे अध्यक्ष वैभव घरत, सुहास देशमुख, जयश्री पाटील, कांता पाटील आणि इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अंत्योदय कार्डधारकांना होणार प्रतिमाह एक किलो साखरेचे वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंत्योदय कार्डधारकांना दीड वर्षांनंतर रेशन दुकानातून प्रतिमाह एक किलो साखरेचे वितरण केले जाणार आहे. त्यानुसार पुरवठा विभागाच्या गोदामामध्ये साखर उपलब्धही झाली आहे. २० रुपये किलोने साखरेचा पुरवठा केला जाणार आहे. एका अंत्योदय कार्डला रेशन दुकानातून प्रतिमहा एक किलो साखरेचे वितरण केले जाणार आहे. यामुळे अत्यंत गरीब आणि गरजू कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे.

मागील दीड वर्षांपासून साखरेच्या टेंडर प्रक्रियेअभावी रेशन दुकानांमधून साखर वितरण पूर्णपणे बंद होते. अंत्योदय कार्डधारकांना तब्बल दीड वर्षानंतर रेशनवर साखर मिळणार असून आगामी काही दिवसांतच रेशन दुकानातून साखरेचे वाटप सुरू होणार आहे. यामुळे सामान्य नागरिकांना नववर्षाआधीच गोडवा मिळाला आहे.

पनवेल पुरवठा विभागातील सहा हजार ८०० पेक्षा अधिक अंत्योदय कार्डधारकांना साखर २० रुपये किलो दराने मिळणार आहे. सध्या बाजारात साखरेचा दर ४५ ते ४८ रुपये किलो आहे. पनवेलच्या गोदामांमध्ये साखर उपलब्ध झाली असून लवकरच वितरित करण्यात येणार असल्याची माहिती पुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे. सध्या बाजारात साखरेचे भाव बाजारात वाढलेले आहेत. ४५ ते ४८ रुपये प्रती किलो दराने साखर बाजारात उपलब्ध आहे. पनवेलमधील सहा हजार ८०० पेक्षा अधिक अंत्योदय कार्डधारकांना वीस रुपये दराने एक किलो साखर रेशन दुकानावर मिळणार आहे.



**पनवेल : तालुक्यातील कोंडले येथील भाजप कार्यकर्ते रवींद्र पाटील यांची कन्या आकांक्षा पाटील हिने पनवेल केशवजी वीरजी कन्या विद्यालयात झालेल्या भेटकार्ड स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिला गौरविण्यात आले.**

# नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पनवेल परिसरातील फार्महाऊस गजबजणार

**पनवेल : वार्ताहर**

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पनवेल परिसरातील फार्महाऊस गजबजताना दिसणार असल्याने अनेक फार्महाऊसमध्ये सर्व शासकीय नियमांचे पालन करीत जय्यत तयारी सुरू असल्याचे दिसत आहे.



यावर्षी वर्ष अखेर ३१ डिसेंबरला असून या दिवशी बुधवार आहे. त्यामुळे विविध परिसरातील पर्यटक मोठ्या प्रमाणावर पनवेल परिसरात मोठी गर्दी करणार व आहेत. थर्टी फर्स्टच्या दिवशी बुधवार असल्यामुळे पिणाऱ्यांची मोठी चंगळ होणार आहे. हजारो कोंबड्या, कोंबडे, बकरे यांची कत्तल होणार आहे. यावर्षी पाऊस जवळजवळ सहा महिने सातत्याने पडत होता. त्यामुळे वातावरणात मोठा बदल झाला असून वालाच्या शेंगाचा बहर उशिराने येणार आहे. त्या दिवशी पोपटीची चंव फार थोड्या प्रमाणावर मिळणार आहे. गावठी कोंबड्यांची मागणी मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे कोंबडीची किंमत ४०० ते ५०० रुपये तसेच कोंबड्याची किंमत रु ८०० आणि त्यापुढे आहे. गावठी कोंबडा कोंबडीच्या शोधामध्ये अनेक जण आताच फिरू लागले आहेत.

पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात फार्महाउस असून फार्महाऊसमध्ये दरवर्षी नवीन वर्षाच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी असते. या वर्षीसुद्धा मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे परिसरातील नागरिकांनी पनवेल परिसरात असलेल्या फार्महाऊसमध्ये नवीन वर्षाचे स्वागत करण्याचे योजिले असल्याने पूर्वीपासून त्यांनी येथे बुकींग करून ठेवली आहे. फार्महाउस वाल्यांनी सुद्धा सर्वसामान्यांना परवडेल असे दर ठेवले आहेत. त्यामुळे हे फार्महाउस हाऊसफुल्ल झाले आहेत.

> **दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या प्रमाणात ग्राहक रिसॉर्टमध्ये येणार असल्याने सर्व शासकीय नियमांचे पालन करून येथे नियोजन करण्यात आल्याने त्यांना एक वेगळा अनुभव यावर्षीसुद्धा नक्कीच मिळेल.**
> **–संतोष उरणकर, फार्महाऊस मालक**

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात गाडगेबाबा पुण्यतिथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात गाडगेबाबा पुण्यतिथी कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय उलवे मराठी माध्यम या ठिकाणी अत्यंत उत्साहात झाला.

सकाळी ठीक आठ वाजता नविद्यालयाचे संपूर्ण परिसर विद्यार्थ्यांनी स्वच्छ केले. गोळा केलेला कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीमध्ये पाठवून दिला तर नंतर सभेचा कार्यक्रम पार पडला. गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक भरणुके यांनी गाडगेबाबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला, तर धनाजी पाटील सर यांनी श्रीफळ अर्पण केले.

विद्यालयाच्या भगिनी शिक्षिका भारती मॅडम, चित्रलेखा पाटील, वेदांगी म्हात्रे मॅडम, रोहिणी घरत आणि शिपाई ठाकूर काका यांनी प्रतिमेला पुष्प अर्पण केले व दीप प्रज्वलन केले त्यानंतर गाडगेबाबांचा संपूर्ण जीवन परिचय विद्यार्थ्यांनी आपल्या मधुर वाणीतून देण्याचा प्रयत्न केला इयत्ता आठवीच्या वर्ग शिक्षिका म्हात्रे मॅडम यांनी मौलिक मार्गदर्शन केले. तर अध्यक्षीय भाषण मुख्याध्यापक सरांनी अंधश्रद्धा अज्ञान यामुळे समाजात चालणाऱ्या ढोंगी व कुप्रथांच्या विरोधात बाबांनी जनजागरण केले हातात झाडू घेतले आणि गाव स्वच्छ केले रात्री कीर्तनातून लोकांना प्रबोधन केले. गोपाळा गोपाळा देवकीनंदन गोपाळा हे भजन कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी म्हटले शेवटी या महान स्वच्छता दूताला सर्वांनी भावपूर्ण अभिवादन केले व आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.




# वडगावमध्ये घरपट्टी, पाणीपट्टीत सूट

**मोहोपाडा :** महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत रसायनी पाताळगंगा परिसरातील वडगाव ग्रुप ग्रामपंचायतीची अंतर्गत मागील घरपट्टी व पाणीपट्टीसहित चालू घरपट्टी व पाणीपट्टी भरणे आवश्यक असल्याने ग्रामपंचायत अधिकारी सुहास विष्णू वारे यांनी अभियानानूसार ५० टक्के सूट जाहिर केली आहे.

या ग्रामपंचायतीवर विनोद चांदोरकर प्रशासक म्हणून काम पाहत आहेत. ही सूट फक्त निवासी संकूलास घरपट्टी आणि पाणी पट्टीवर लागू असेल. त्यामुळे अनेक थकबाकी धारकांना दिलासा मिळाला. या योजनेची मुदत ३१, डिसेंबर, २०२५ पर्यंतच लागू असल्याने जास्तीत जास्त लोकांनी या योजनेचा फायदा घ्यावा, असे वडगाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.



## संपादकीय

# भाजपसह महायुतीला कौल

महाराष्ट्रात दोन टप्प्यांमध्ये झालेल्या नगर परिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीचा निकाल रविवारी जाहीर झाला. राज्यात भाजपसह महायुतीची लाट कायम असल्याचे या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अंतर्गत येणाऱ्या या निवडणुकीत भाजपचे सर्वाधिक शंभरहून अधिक नगराध्यक्ष निवडून आले असून घटकपक्ष मिळून दोनशेपेक्षा जास्त नगराध्यक्ष विजयी झाल्याने महायुतीची कामगिरीही दमदार राहिली आहे.

**कोरोना महामारी, ओबीसी आरक्षणाचा दीर्घकाळ प्रलंबित राहिलेला प्रश्न तसेच न्यायालयीन प्रक्रियांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनेक वर्षे रखडल्या होत्या. या विलंबाचा थेट परिणाम नगर परिषद, नगरपंचायत आणि इतर स्थानिक आस्थापनांच्या कारभारावर झाला. लोकनियुक्त प्रतिनिधी नसल्याने प्रशासकांच्या माध्यमातून प्रशासन चालवावे लागले, ज्यामुळे निर्णय प्रक्रियेत लोकप्रतिनिधींची भूमिका दुय्यम ठरली. परिणामी स्थानिक प्रश्न, नागरी सुविधा, विकासकामे आणि नागरिकांच्या तक्रारी यांना अपेक्षित गती मिळू शकली नाही. याचा परिणाम केवळ प्रशासकीय यंत्रणांपुरता मर्यादित न राहता संबंधित शहरांतील आणि गावांतील जनमानसावरही झाला. लोकशाही प्रक्रियेपासून दूर राहिल्याची भावना नागरिकांमध्ये बळावत गेली, तर स्थानिक स्वराज्य व्यवस्थेवरील विश्वासाला धक्का बसण्याची स्थिती निर्माण झाली. त्यामुळे रखडलेल्या निवडणुका पूर्ण होणे हे केवळ राजकीय नव्हे, तर लोकशाही सुदृढतेच्या दृष्टीनेही अत्यंत आवश्यक होते. अखेर अडथळ्यांवर मात करीत या निवडणुका होत आहेत. त्यातील नगरपालिकांच्या निवडणुका दोन टप्प्यात घेण्यात आल्या. स्थानिक निवडणुकांमध्ये वेगवेगळ्या आघाड्या-युत्या होत असतात. त्या या वेळीही पहायला मिळाल्या. ऐन थंडीत प्रचार रंगला, मतदान झाले आणि अखेर निकालही जाहीर झाला. या निकालांमधून राज्यात महायुतीचे वर्चस्व कायम असल्याचे ठळकपणे दिसून येत आहे. भाजपचा विजय हा केवळ संघटनात्मक ताकदीचा परिणाम नाही, तर केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची जमिनीवर झालेली पोहच याचाही परिपाक आहे. पंतप्रधान आवास योजना, जलजीवन मिशन, उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत तसेच राज्य सरकारच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या विविध पायाभूत विकासकामांचा थेट फायदा मतदारांना मिळाल्याचे या निकालांतून दिसून येते. 'डबल इंजिन सरकार' ही संकल्पना भाजपने प्रभावीपणे मतदारांपर्यंत पोहचवली आणि त्याचा लाभ पक्षाला झाला, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. महत्त्वाची बाब म्हणजे महायुतीतील घटक पक्षांची कामगिरीही दुर्लक्ष करण्याजोगी नाही. शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी अनेक ठिकाणी भाजपसोबत समन्वय राखत स्थानिक पातळीवर यश मिळवले, तर काही ठिकाणी स्वतंत्र लढत देऊनही मते मिळवली आहेत. यामुळे महायुती ही केवळ वरवरची राजकीय आघाडी नसून ती स्थानिक पातळीवरही रूजत चालल्याचे संकेत मिळतात. या पार्श्वभूमीवर विरोधकांची स्थिती चिंताजनक म्हणावी लागेल. विरोधी पक्षांना अपेक्षित यश मिळालेले नाही. काही ठिकाणी यश मिळाले असले तरी एकसंध रणनीतीचा अभाव, स्थानिक नेतृत्वातील मतभेद आणि कार्यकर्त्यांमधील निराशा यांचा फटका या पक्षांना बसलेला दिसतो. गेली अनेक वर्ष प्रशासकराज असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आता लोकप्रतिनिधी निवडून जात असल्याने कामकाजाला अधिक गती आणि ठोस धोरण लाभणार आहे.**

# शिखांचे दहावे गुरू गोविंद सिंग



शिखांचे गुरु गोविंद सिंग यांनी १६९९ साली खालसा पंथाची स्थापना केली. शीखांच्या इतिहासातील ही सर्वात महत्त्वाची घटना मानली जाते. गुरु गोविंद सिंग यांनीच गुरु ग्रंथ साहिब यांना शिखांचे गुरू घोषित करून गुरु परंपरा संपुष्टात आणली. आज गुरु गोविंद सिंग यांच्या जयंतीनिमित्त जाणून घ्या त्यांच्याबद्दल सर्व काही. गुरु गोविंद सिंग यांचा जन्म पटना साहिब येथे झाला. त्यांचे बालपणीचे नाव गोविंद राय होते. पटना येथे गुरू गोविंद सिंग यांचा जन्म झाला ते ठिकाण आता पटना साहिब म्हणून ओळखले जाते. तेगबहादुर हे त्यांचे वडील. आईचे नाव गुजरी. जन्म बिहारमधील पाटणा येथे. लहानपणी 'गोविंदराय' या नावाने ते ओळखले जात. त्यांनी दोन विवाह केले होते; जीतो व सुंदरी ही त्यांच्या पत्नींची नावे. अजितसिंग,जुझारसिंग, जोरावरसिंग व फतहसिंग ही त्यांची चारही मुले पुढे लढायांत मारली गेली.

त्यांचे वडील गुरु तेग बहादूर यांच्या निधनानंतर, ते ११ नोव्हेंबर १६७५ रोजी गुरु झाले, जेव्हा ते केवळ ९ वर्षांचे होते. त्यांच्या वडिलांचा मृत्यू सामान्य नव्हता तर औरंगजेबाची धर्मांतराची मोहीम रोखताना त्यांची हत्या करण्यात आली होती. औरंगजेबाकडून वडिलांची हत्या औरंगजेब तेव्हा हिंदूंचे जबरदस्तीने धर्मांतर करत होता. पीडित लोकं तक्रार घेऊन गुरू तेग बहादूर यांच्यापर्यंत पोहोचले. या गोष्टीला विरोध करताच दिल्ली येथील चांदनी चौक येथे गुरु तेग बहादूर यांचा शिरच्छेद करण्यात आला. त्यानंतर लगेचच त्यांचा मुलगा गुरु गोविंद सिंग यांनी जबाबदारी घेतली. तेव्हापासून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य लोकांची सेवा करण्यात आणि सत्याच्या मार्गावर चालण्यात व्यतीत केलं. (१६७५) वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी गोविंदसिंग गादीवर आले.

आपल्या प्रभावी नेतृत्वाने त्यांनी शीख समाज सुसंघटित केला व शिखांमध्ये राजकीय जागृती निर्माण केली. 'खंडेदाअमृत' नावाचा एक शिख दीक्षाविधीही त्यांनी सुरू केला. या दीक्षेनंतर त्यांचे अनुयायी आपल्या नावापुढे 'सिंग' ही उपाधी लावू लागले व 'पंच ककार' (केस, कंगवा, कच्छ, कडे आणि कृपाण) धारण करू लागले. त्यांच्या अनुयायांना 'खालसा'(म्हणजे अत्यंत शुद्ध) म्हणून संबोधले जाते. खालसा पंथाचे ते संस्थापक होत. गुरुपद्धतीचा शेवट गुरू गोविंद सिंग यांनी गुरुपद्धती रद्द करत गुरु ग्रंथ साहिबला सर्वोच्च घोषित केलं, त्यानंतर गुरु ग्रंथ साहिबची पूजा झाली आणि गुरुपद्धतीचा संपुष्टात आली. शीख समाजात ही मोठी घटना मानली जाते.

यासोबतच गोविंद सिंग यांनी खालसा वाणी वाहेगुरु जी का खालसा, वाहेगुरु जी की फतह ही घोषणा दिली. गुरू गोबिंग सिंग यांनी खालसा पंथाच्या रक्षणासाठी मुघल आणि त्यांच्या मित्रपक्षांशी अनेक वेळा युद्ध केलं. खालसा पंथाने एका नव्या युगाची सुरुवात गुरू गोविंद सिंग जी यांच्या नेतृत्वाने शीख समाजाच्या इतिहासात अनेक नवीन गोष्टी आल्या, त्यापैकी एक खालसा पंथाची स्थापना मानली जाते.

खालसा पंथाची स्थापना गुरु गोविंद सिंग यांनी १६९९ मध्ये आनंदपूर साहिब येथे बैसाखीच्या दिवशी केली होती. या दिवशी त्यांनी पाच प्रिय व्यक्तींना अमृत देऊन खालसा बनवलं. नंतर त्यांनी स्वतः त्याच पाच व्यक्तींच्या हातून अमृत प्याले. त्या ५ गोष्टी, ज्या त्याची देणगी आहेत त्यांनी खालसांना पाच तत्त्वे दिली, ज्यांना ५ क कार म्हणतात. पंच क कार म्हणजे 'क' शब्दापासून सुरू होणाऱ्या त्या ५ गोष्टी, ज्या सर्व खालसा शीखांनी गुरू गोविंद सिंग यांच्या तत्त्वांनुसार परिधान केल्या पाहिजेत. गुरु गोविंद सिंग यांनी शिखांसाठी पाच गोष्टी अनिवार्य केल्या होत्या – 'केश', 'कडा', 'कृपाण', 'कंघा' आणि 'कच्छ'. त्यांच्याशिवाय खालसा पोशाख पूर्ण मानला जात नाही. शौर्य व राष्ट्रभक्ती या गुणांना त्यांनी आपल्या शिकवणुकीत अग्रस्थान दिले. आपल्या अनुयायांना लष्करी शिक्षण देऊन त्यांची एक शिस्तबद्ध फौज त्यांनी तयार केली व औरंगजेबाविरुद्धच्या अनेक लढायांत विजय मिळविले. आपल्यानंतर शिखांचा पवित्र धर्मग्रंथ ग्रंथसाहिब यासच गुरुस्थानी मानावे, असा आदेश त्यांनी आपल्या अनुयायांना दिला.

औरंगजेबाच्या मृत्युनंतर त्याच्या मुलांत दिल्लीच्या तख्ताबद्दल चाललेल्या तंट्यात गोविंदसिंगानी औरंगजेबाचा ज्येष्ठ पुत्र बहादुरशाह याची बाजू उचलून धरली व त्यास तख्तावर येण्यास मदत केली. त्यामुळे बहादुरशाहाने गोविंदसिंगांचा मोठा सन्मान केला. पुढे बहादुरशाहाचा धाकटा भाऊ कामबख्श याचे बंड मोडून काढण्यासाठी गोविंदसिंग बहादुरशाहाबरोबर दक्षिणेस गेले असताना, नांदेड मुक्कामी एका पठाणाने अचानक हल्ला करून गोविंदसिंगाचा वध केला.

अनेक भाषांचे जाणकार आणि उत्तम लेखक वयाच्या ९ व्या वर्षी जगातील सर्वात शक्तिशाली समुदायांपैकी एकाची कमान घेणारे गुरु गोविंद सिंग हे केवळ नायक नव्हते तर ते एक भाषा तज्ञ आणि चांगले लेखक देखील होते. त्यांना संस्कृत, फारसी, पंजाबी आणि अरबी भाषांचे ज्ञान होते. त्यांनी अनेक ग्रंथ रचले, जे आजही शीख समाजात उत्साहाने वाचले जातात.दरबारात लेखक आणि कवींची उपस्थिती होती. त्यांना विद्वानांची मोठी समज होती आणि असे म्हणतात की त्यांच्या दरबारात नेहमी लेखक आणि कवी यांची उपस्थिती असायची. यामुळेच गुरु गोविंद सिंग यांना संत शिपाई असेही संबोधले जाते.

गोविंदसिंगांनी विपुल ग्रंथरचना केली आहे. त्यांचे संस्कृत, फार्सी, पंजाबी व व्रज भाषांवर चांगले प्रभुत्व होते. त्यांची ग्रंथरचना फार्सी, पंजाबी, व्रज व हिंदी या चारही भाषांत आहे. त्यांची भाषाशैली ओजस्वी असून आपल्या काव्यात त्यांनी विविध छंदांचा उपयोग केला आहे. दसम ग्रंथ (दशम ग्रंथ–दहाव्या गुरूंचा पवित्र ग्रंथ) या ग्रंथात गोविंदसिंगांच्या पंजाबी, हिंदी, फार्सी रचना संकलित केलेल्या असून, जाप (जापु)साहिब, विचित्र नाटक (आत्मचरित्र), ज्ञान प्रबोध, अकाल उस्तति, जफरनामा (शुद्ध फार्सी भाषेत औरंगजेबाला उद्देशून लिहिलेला पत्ररूप पद्यग्रंथ) या त्यांतील काही प्रमुख रचना होत. विद्यासागर, गोविंद गीता, चांदी–दी वार हे त्यांचे ग्रंथही विशेष प्रसिद्ध आहेत. याशिवाय अनेक विद्वानांकरवी संस्कृत साहित्यकृतींचे हिंदी व पंजाबी भाषांतून त्यांनी अनुवादही करून घेतले.

**विश्वासघाताने हत्या**

धर्माच्या रक्षणासाठी गुरु गोविंद सिंग यांनी एक एक करून आपल्या संपूर्ण कुटुंबाचं बलिदान दिलं होतं. यानंतर त्यांना 'सर्बंसदानी' (सर्वज्ञ दाता) असेही संबोधले जाऊ लागले. याशिवाय लोक त्यांना कलगीधर, दशमेश, बजनवाले अशा अनेक नावांनी हाक मारत. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर घाबरलेल्या नवाब वजीत खानने गुरू गोविंद सिंग यांना कपटाने मारले. बहादुरशाहाचा धाकटा भाऊ कामबख्श याचे बंड मोडून काढण्यासाठी गोविंदसिंग बहादुरशाहाबरोबर दक्षिणेस गेले असताना, नांदेड मुक्कामी एका पठाणाने अचानक हल्ला करून गोविंदसिंगाचा वध केला.ही ७ ऑक्टोबर १७०८ ची घटना असल्याचे समजते. गुरू गोविंदसिंग गेल्यानंतरही त्यांचा शब्द खालसा पंथ आणि पंच ककार या रूपाने शीख धर्मीयांमध्ये सर्वोच्च मानला जातो.

नांदेड येथे त्यांची समाधी (श्री हुजूर अबचलनगर सचखंड अकालतख्त श्रीगुरूद्वारा) असून ते शिखांचे एक महत्त्वाचे धर्मक्षेत्र मानले जाते. जानेवारी १९६७ मध्ये त्यांची तीनशेवी जयंती राष्ट्रीय पातळीवर मोठ्या उत्साहाने साजरी केली. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाइल, डेक्सटॉपवर गुगल स्क्रोम स्लो? हे करा

सध्याच्या तंत्रज्ञानाच्या जगात आपण सगळेच इंटरनेटचा वापर करतो. त्यासाठी गुगल क्रोम आणि गुगल ब्राउझर या



पच्या सर्च बारमध्ये क्लिक करून तुम्ही विविध विषयांचे प्रकल्प, कोणत्या ठिकाणी कमी किंमतीत फार्महाऊस मिळेल आदी बऱ्याच काही गोष्टींची माहिती आपण सहज मिळवू शकतो.

पण, अनेकदा असे होते की, आपण गुगल क्रोमवर एकाच वेळी अनेक टॅब चालू करतो. त्यामुळे लॅपटॉप, संगणक हँग होण्याची आणि हे प स्लो चालण्याची शक्यता जास्त असते. तर त्यासाठी गुगल क्रोमच्या सेटिंगमध्ये 'Hardware Acceleration' नावाचे फीचर आहे ज्याच्या मदतीने तुम्ही गुगल क्रोमचा वेग वाढवू शकता.

गुगल क्रोम सध्या उपलब्ध असलेल्या सर्वांत वेगवान आणि लोकप्रिय इंटरनेट प्सपैकी एक आहे. तर 'हार्डवेअर क्सेलरेशन' (Hardware Acceleration) नावाचे फीचर क्रोमला आणखी वेगवान बनवू शकते. वेबपेज आणि कन्टेन्ट रेंडर करण्यासाठी गुगल क्रोम तुमच्या मशीनच्या सीपीयू आणि सॉफ्टवेअरचा वापर करते. तसेच हार्डवेअर क्सेलरेशन हे फीचर तुम्ही सक्षम केल्यास ब्राउझरचा परफॉर्मन्स आणि प्रतिसाद सुधारेल. तुम्ही अनेकदा बऱ्याच वेब पेजला भेट देत असल्यास किंवा ब्राउझरवर अनेक व्हिडीओ पाहत असाल, तर हे फीचर तुमच्यासाठी खूप उपयुक्त आहे.

गुगल क्रोममध्ये 'Hardware Acceleration' नावाचे फीचर enable कसे कराल?

१. क्रोम लाँच करा आणि स्क्रीनच्या वरच्या उजव्या बाजूला दिसणार्या उभ्या थ्री–डॉट बटणावर क्लिक करा.

२. त्यानंतर सेटिंग्जवर क्लिक करा आणि डाव्या पॅनेलवर दिसणाऱ्या 'सिस्टीम' टॅबवर जा.

३. तुम्हाला पेजवर 'Use hardware acceleration when available' नावाचा पर्याय दिसेल; तो ऑन करा आणि क्रोम पुन्हा री–लाँच करा.ब्राउझर पुन्हा लाँच केल्यानंतर त्याच पृष्ठावर जाऊन हार्डवेअर प्रवेग सक्षम केला आहे का याची याची खात्री करू शकता. वापरकर्ते क्रोमच्या ड्रेस बारमध्ये 'chrome://gpu' टाइप करून एंटर दाबू शकतात. फीचर सक्षम असल्यास, तुम्हाला 'ग्राफिक फीचर स्टेटस' सेक्शनमध्ये हिरव्या रंगाच्या मजकुरात 'हार्डवेअर क्सेलरेशन' दिसेल

# महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन



## निमित्त

नारायण शालेय जीवनात बरेच जणांना कठीण वाटणारा विषय म्हणजे गणित. गणिताची चाचणी म्हटलं की तेव्हा प्रत्येकाच्या अंगावर शहारे यायचे, पण तेच शालेय जीवनात कधी पदवीच्या मुलांना शिकवले का? नाही ना! पण आपल्याच देशाच्या एका महान व्यक्तिमत्वाने शाळेत असताना पदवीच्या मुलांना गणित शिकवले, ते व्यक्तिमत्व म्हणजे श्रीनिवास रामानुजन.


श्रीनिवास रामानुजन यांचा जन्म २२ डिसेंबर १८८७ रोजी झाला. त्यांचा परिवार भारताच्या तामिळनाडूच्या कोइम्बतुरमधील इरोड गावचे. वडील श्रीनिवास अय्यंगर हे साड्यांच्या दुकानात मुनीम म्हणून काम पाहत असत, तर आई कोमल तम्मल गृहिणी असतानाच सोबत एका स्थानिक मंदिरात गयिकासुद्धा होत्या आणि ज्याप्रमाणे प्रत्येक मुलाला आपल्या आईची जवळीक असते तसे त्यांनाही त्यांच्या आईजवळ राहायला जास्त आवडायचे. सुरुवातीला रामानुजन कुम्भकोणम या गावी आपल्या परिवारासोबत राहायचे.त्यांचे प्राथमिक शिक्षण या गावामध्येच झाले.

ते सातवीत असतानाच पदवीच्या त्या मुलांना गणित शिकवत असत. यावरून आपण समजू शकतो रामानुजन नावाच्या या गणितज्ञामध्ये किती मोठी प्रतिभा लपलेली होती.

रामानुजन यांना गणित आणि इंग्रजी या दोन विषयांची विशेष आवड होती. सुरुवातीला त्यांना त्यांच्या अलौकिक प्रतिभेमुळे शिष्यवृत्ती मिळाली. रामानुजन गणितामध्ये एवढे मग्न झाले होते की त्यांनी इतर विषयांकडे लक्षच दिले नाही, रामानुजन यामुळे बारावीमध्ये नापास झाले. आणि त्यांना मिळणारी शिष्यवृत्तीसुद्धा बंद झाली. त्यानंतर त्यांच्या शिक्षणाचे दरवाजे बंद झाले. आता ते बेरोजगार झाले होते, हा काळ त्यांच्यासाठी खूप कठीण काळ होता या कठीण काळात त्यांच्याकडे त्यांच्या गणिताशिवाय कोणतीही गोष्ट नव्हती. त्यांना या कठीण काळात खूप काही सहन करावे लागले, जसे लोकांजवळ त्यांना पैशांची भिकसुद्धा मागावी लागली, रस्त्यावरचे कागदसुद्धा उचलून आपला उदरनिर्वाह करावा लागला. त्यानंतर त्यांची तब्येत घसरली. याच दरम्यान १९०८मध्ये त्यांच्या आईने त्यांचे लग्न जानकी नावाच्या एका मुलीशी लावले. त्यानंतर त्यांच्यावर आणखी एक जबाबदारी येऊन पडली होती.

आता त्यांना काम शोधणे अनिवार्य झाले होते, तेव्हा त्यांनी मद्रासमध्ये जाऊन पुन्हा नोकरी मिळण्यासाठी प्रयत्न केले. खूप दिवसांच्या मेहनतीनंतर एक दिवस त्यांची भेट तेथील डिप्टी कलेक्टर व्ही. रामास्वामी अय्यर यांच्याशी झाली, ते गणितामध्ये पारंगत होते. जेव्हा त्यांनी रामानुजन यांनी सोडविलेली गणिते पाहिली तेव्हा त्यांनी ओळखले की, ही व्यक्ती एक प्रतिभावान व्यक्ती आहे आणि त्यांनी रामानुजन यांना कामावर ठेवून घेतले २५ रुपये महिन्याच्या पगाराने. येथून रामानुजन यांचे संपूर्ण आयुष्याला एक वेगळे वळण मिळाले. एक वर्ष मद्रासमध्ये राहून त्यांनी स्वतःचे एक शोध पत्र प्रकाशित केले, त्या प्रकाशित केलेल्या शोधपत्रकाचे नाव होते, जर्नल ऑफ इंडियन मॅथेमेटिकल सोसाइटी असे होते. या शोधपत्रकामुळे त्यांना प्रसिद्धी मिळाली. २६ एप्रिल १९२० रोजी रामानुजन यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यामध्ये अंगदुखी, अशी घ्या काळजी!

हिवाळ्यात बहुतेक लोकांना सकाळी उठल्यानंतर अंगदुखीसारख्या वेदनांना सामोरे जावे लागते. हवामानातील अचानक बदलामुळे सुस्तीदेखील येते.

सांधेदुखीचा त्रास असलेल्यांना शारीरीक हालचालींच्या अभावामुळे सांधेदुखीची त्रास दिसून येतो. काहींना थंडीमुळे अस्वस्थता जाणवते जसे की डोकेदुखी. आपली हाडे, दात आणि सांधे यांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी व्हिटॅमिन डी महत्त्वाची भूमिका बजावते. हिवाळ्यात त्याच्या कमतरतेमुळे,



कॅल्शियम आणि फॉस्फरस योग्यरित्या शोषून घेण्यास शरीराची क्षमता कमी झाल्याने हाडांसंबंधी तक्रारी, फ्रॅक्चर्स, स्नायूंचा कमकुवतपणा दिसून येतो.

**या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे दुखतात हाडे**

हिवाळ्यात पुरेसा सुर्यप्रकाश नसल्याने व्हिटॅमिन डीची कमतरता भासते जी आपल्या हाडांसाठी दुष्परिणाम करते. जेव्हा हवेचे तापमान कमी होते तेव्हा बॅरोमेट्रिक दाब कमी झाल्यामुळे स्नायू आणि ऊतींचा विस्तार होऊन शारीरीक वेदनांसारखी लक्षणे आढळून येतात. यासंदर्भात आर्थ्रोस्कोपिक सर्जन आणि स्पोर्ट्स मेडिसिन स्पेशलिस्ट डॉ. शरीफ दुडेकुला यांनी मार्गदर्शन केलं आहे.

**कशी घ्याल काळजी?**

उबदार आणि संरक्षित राहणे महत्वाचे आहे. यामुळे हंगामात तुमच्या सांध्यांना सूज येण्यापासून प्रतिबंध होईल. डॉक्टर हिवाळ्याच्या महिन्यांत नियमित सांधेदुखी आणि स्नायू दुखणे दूर करण्यासाठी उबदार आंघोळ करण्याची शिफारस करतात. थंडीच्या दिवसात उबदार कपडे घाला. नियमित व्यायामाला महत्त्व द्या. यामुळे हाडे आणि स्नायू लवचिक राहण्यासाठी नक्कीच मदत होईल. शरीरातील व्हिटॅमिन डी पातळी तपासून घ्या, व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स सांधेदुखी कमी करण्यात मदत करतात. रोजच्या जीवनात संतुलित आणि पोषक आहाराचा समावेश करा.

गरम पाण्याने अंघोळ करा, उबदार करडे वापरा हीटिंग पॅडचा वापर करा. तुमच्या पाठीवरील तसेच गुडघे आणि नितंबांच्या सांध्यावरील ताण कमी करण्यासाठी संतुलित वजन ठेवा. गरम पेयाचे सेवन करा, पुरेशी झोप घ्या आणि संतुलित आहाराचे सेवन करा. तुमच्या दैनंदिन जेवणाच्या योजनांमध्ये फळे, सॅलड्स, सूप, बिया, दुग्धजन्य पदार्थ आणि अंडी यांचा समावेश करा.

# पेणमध्ये भाजप महायुतीने गड राखला

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपने गड राखत महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रितम ललित पाटील या ५८६२ मतांनी विजयी झाल्या आहेत. १ नगराध्यक्ष व २४ नगरसेवक पदाच्या जागेवर अगोदरच महायुतीच्या ६ जागा बिनविरोध निवडून आल्याने महायुतीचे पारडे जड झाले होते. यामध्ये प्रभाग क्र.५ (ब) मधून दीपक जयवंत गुरव, प्रभाग ९ (अ) मधून वसुधा तुकाराम पाटील, प्रभाग १२ (अ) मधून सुशिला हरिश्चंद्र ठाकूर व प्रभाग १२ (ब) मधून अभिराज रमेश कडू हे बिनविरोध निवडून आले होते. व आज शेवटच्या दिवशी प्रभाग ११ (अ) मधून मालती तुकाराम म्हात्रे व प्रभाग ११ ( ब) मधून स्मिता पांडुरंग माळी हे बिनविरोध निवडून आले होते. यामुळे खऱ्या अर्थाने या निवडणुकीत महायुतीने आघाडी घेतल्याचे चित्र पाहावयास मिळत होते.





यावेळी १ नगराध्यक्ष व १८ नगरसेवक पदासाठी २ डिसेंबर रोजी मतदान झाले. आज या मतदानाचे निकाल जाहीर करण्यात आला. यावेळी भाजप , राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवारांनी विजय संपादन करीत पेण नगरपरिषदेवर महायुतीचा झेंडा फडकविला. यावेळी विजयी उमेदवारांचे आमदार रविशेठ पाटील, खासदार धैर्यशिल पाटील यांनी अभिनंदन केले पेणमध्ये महायुतीच्या उमेदवारांची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. या निवडणुकीत शिवसेना उबाठा गट १ , शिवसेना शिंदे गट १ असे खाते उघडले असून नगरविकास आघाडी ३ व पेणकर आघाडी २ जागी उमेदवारांनी विजय संपादन केला. यावेळी प्रभाग १ (अ) मधून कलावती पाटील – (मिळालेली मते ११४८), प्रभाग १ (ब) मधून संतोष शृंगारपुरे (मिळालेली मते ११७०), प्रभाग २ (अ) मधून पल्लवी प्रसाद कालेकर, (मिळालेली मते ११३),

## नगराध्यक्षपदी प्रितम पाटील

प्रभाग २ (ब) मधून प्रवीण शंकर पाटील (मिळालेली मते १०९७), प्रभाग ३ (अ) मधून सुजाता यशवंत डाकी (मिळालेली मते १३४४), प्रभाग ३ (ब) मधून संजय परशुराम म्हात्रे (मिळालेली मते १२३६), प्रभाग ४ (अ) अरुणा सुहास पाटील (मिळालेली मते ९११), प्रभाग ४ ( ब) मधून भूषण पांडुरंग कडू,(मिळालेली मते ८१९) प्रभाग ५ (अ) मधून अंजली वैभव जोगळेकर (मिळालेली मते ९७७) प्रभाग ६ (अ) मधून संगीता दिलीप लाड, (मिळालेली मते १४५६) प्रभाग ६ (ब) मधून आनंद पांडुरंग जाधव, (मिळालेली मते ९०७) प्रभाग ७ (अ) मधून अफ्रिन मुद्दसीर अखवारे, (१०८१) प्रभाग ७ (ब) मधून कृष्णा (सद्दाम) भोईर (मिळालेली मते ८६५) प्रभाग ८ (अ) जास्वीन अमित पाटील (मिळालेली मते ११४०), प्रभाग ८ (ब) अनिरुद्ध रविंद्र पाटील, (मिळालेली मते १११४), प्रभाग ९ (ब) मधून निवृत्ती भास्कर पाटील (मिळालेली मते १०३०), प्रभाग १० (अ) मधून सुनीता शिवराम जोशी (मिळालेली मते ११७८), प्रभाग १० (ब) मधून निळकंठ सखाराम म्हात्रे (मिळालेली मते ११९१) हे उमेदवार निवडून आले आहेत.

# खोपोली नगरपालिकेवर महायुतीचा भगवा फडकला

**खोपोली : प्रतिनिधी**

महायुतीच्या शिवसेनेचे कुलदीपक शेंडे यांनी १११८ मतांची आघाडी घेत खोपोली नगर नगरपालिकेवर महायुतीचा झेंडा फडकवला यात कुलदीपक शेंडे यांना २०४६९ तर परिवर्तन आघाडीचे राष्ट्रवादीचे सुनील पाटील यांना १९३५१ मते पडले.

रविवारी सकाळी दहा वाजता निकालास प्रारंभ झाला. सुरुवातीपासूनच नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कुलदीपक शेंडे यांनी आघाडी घेतली. या निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाला ७ जागा, शिवसेनेला १४, भारतीय जनता पक्षाला ४, शेतकरी कामगार पक्षाला ४, अपक्ष१, शरद पवार गट १, असे उमेदवार निवडून आले.

एकेकाळी राष्ट्रवादीची नगरपालिकेवर सत्ता होती ती सत्ता यावेळेस महायुतीने खेचून घेतली, शेतकरी कामगार पक्षाला सुद्धा या निवडणुकीत चार जागांवर यश मिळाले आहे, शरद पवार गटाने एक जागावर विजय मिळवला तर शिवसेनेचा पूर्वीचा राहुल गायकवाड याला तिकीट न मिळाल्याने त्यांनी अपक्ष निवडणूक लढवली व त्यात तो विजयी झाला. नगराध्यक्ष पदासाठी एकूण सात उमेदवार होते त्यात दोन पत्रकारांचाही समावेश होता

एक महिन्यापासून प्रचारात आघाडी कुंडीपक शेंडे यांनी घेतल्याने त्यांना यश मिळाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जाते शेंडे यांना राजकीय पार्श्वभूमी आहे त्यांचे वडील रामदास शेंडे हे तीन वेळा नगराध्यक्ष पद भूषविले होते राष्ट्रवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते व नगराध्यक्ष पदाचा व अनेक वर्षाचा राजकीय अनुभव असलेले दत्ताजी मसुरकर यांचा या निवडणुकीत पराभव झाला

खोपोली राजकारणाचा इतिहास सांगणारे साबळे कुटुंबियांपैकी विक्रम साबळे हे सुद्धा राजकारणात उतरले आणि पहिल्याच निवडणुकीत चांगल्या मताने विजयी झाले.



# महाडमध्ये नगराध्यक्षपदी शिवसेनेचे सुनील कविस्कर

## राष्ट्रवादी-भाजप १२, तर शिंदे गट आठ जागी विजयी

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगरपालिका निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला असून महाड नगरपालिकेवर नगराध्यक्षपदी शिवसेना शिंदे गटाने वर्चस्व प्राप्त केले असून एकूण नगरसेवक संख्येत मात्र राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि भाजप आघाडीने बाजी मारली आहे. यामुळे महाडमध्ये गड आला पण सिंह गेला अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पंचवीस वर्षा नंतर या वेळी भाजपाला महाड नगरपलिका सभागृहात जाण्याची संधी मिळाली आहे. या वेळी भाजपाचा पाच पैकी दोन सदस्य निवडून आले आहेत.



महाड नगरपालिका निवडणुकीचे मतमोजणी महाड नगरपालिकेच्या प्रशासकीय भावनांमध्ये पार पडली. सकाळी दहा वाजता प्रत्यक्ष मतमोजणीला निवडणूक निरीक्षक प्रतिमा पुदलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरुवात झाली. मतमोजणी सुरू झाल्यानंतर अवघ्या काही तासातच निकाल बाहेर पडू लागले. महाड नगरपालिकेच्या निवडणूक निकालामध्ये यावेळी अनपेक्षित निकाल लागले आहेत. नगराध्यक्षपदी सुनील कविस्कर यांनी राष्ट्रवादी भाजप युतीचे उमेदवार सुदेश कळमकर यांचा ५५४ मतांनी पराभव करत विजय प्रस्थापित केला आहे. यामुळे महाड नगरपालिकेवर शिवसेना शिंदे गटाचे वर्चस्व प्रस्थापित झाले असले तरी नगरसेवक संख्येमध्ये भाजप–राष्ट्रवादीने बाजी मारली आहे. महाड नगरपालिकेमध्ये भाजपा राष्ट्रवादीचे १२ उमेदवार विजयी झाले असून शिवसेना शिंदे गटाला मात्र ८ जागांवर समाधान मानावे लागले आहे.

महाड नगरपालिका निवडणुकांचे निकाल आज जाहीर झाल्यानंतर अनेक ठिकाणी अनपेक्षित निकाल लागल्याचे पहावयास मिळाले आहे. यामुळे शिवसेना शिंदे गट आणि भाजप राष्ट्रवादी युती अशा दोन्ही गटांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. महाड शहरामध्ये एकूण १० प्रभागांमध्ये एकूण मतदान झाले होते. आज झालेल्या मतमोजणी दरम्यान विजयी उमेदवारांमध्ये प्रभाग क्रमांक १ मध्ये रणजीत साळी , आणि वैशाली अमोल रक्ते , प्रभाग क्रमांक २ मध्ये महेश शेडगे , मानवी गोळे , प्रभाग क्रमांक ३ मध्ये प्रमोद महाडिक, गीतांजली महाडिक , प्रभाग क्रमांक ४ मधून हेमंत चांदलेकर , गायत्री कविसकर प्रभाग क्रमांक ५ मध्ये वजीर कोंडीवकर , हवा पानसरी , प्रभाग क्रमांक ६ सुरज बामणे, सौ. विद्या देसाई , प्रभाग क्रमांक ७ मधून सौ. पूजा गोविलकर , संदीप जाधव , प्रभाग क्रमांक ८ मध्ये अक्षया हेलेकर , सुमित पवार प्रभाग क्रमांक ९ मधून निखिल शिंदे , दीक्षा शिंदे, प्रभाग क्रमांक १० मधून दीपक चव्हाण, मीनल जाधव यांनी विजय मिळवला आहे.

महाड नगरपालिकेवर शिवसेना शिंदे गटाचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. असे असले तरी नगरसेवक संख्येमध्ये भाजप राष्ट्रवादी आघाडीने बाजी मारली आहे.

> **आम्ही वस्तुस्थिती नाकारत नाही, आम्ही कधी चूक करत नाही. त्यामुळे शिवसेनेच्या सर्वांनीच मेहनत घेतल्याचे हे फळ आहे. महाड शहराचा नक्कीच कायापालट केला जाणार आहे. नगराध्यक्षपदासाठी गेली अनेक वर्षे प्रतीक्षा होती ती आता पूर्ण झाली आहे.**
>
> **–भरत गोगावले, मंत्री, महाराष्ट्र राज्य**

> **आमचे काही उमेदवार निश्चित निवडून येतील असे मानले जात होते. त्यांचा पराभव म्हणजे विचार करण्यास भाग पाडणारा आहे. हा निकाल आमच्यासाठी अनपेक्षित आहे.**
>
> **–स्नेहल जगताप–कामत, माजी नगराध्यक्ष महाड**

# रोहा अष्टमी नगर परिषद अध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या वनश्री शेडगे

## भाजप व शिवसेना शिंदे गटाचा प्रत्येकी एक उमेदवार विजयी

**रोहा: प्रतिनिधी**

महाराष्ट्रात प्रतिष्ठित असलेल्या रायगड जिल्ह्यातील रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून रोहा अष्टमी नगरपरिषदेवर पुन्हा एकदा राष्ट्रवादीचा ( अजित पवार गट) झेंडा फडकला आहे.

रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाल्यानंतर राष्ट्रवादीचे ( अजित पवार गट ) प्रभाग क्रमांक २ ब मधून राजेंद्र जैन हे बिनविरोध निवडून आले होते. थेट नगराध्यक्ष पदासह उर्वरित १९ जागेसाठी लढत झाली असून मतमोजणी अंती बिनविरोध आलेल्या राजेंद्र जैनसह राष्ट्रवादीचे ( अजित पवार गट ) एकुण १८ उमेदवार विजयी झाले आहेत. या निवडणुकीत नव्याने भाजपने खाते खोलले असून भाजपचा १ व शिवसेना ( शिंदे गट ) चा १ उमेदवार निवडून आला आहे. थेट नगराध्यक्षपदी राष्ट्रवादी ( अजित पवार गट ) च्या वनश्री शेडगे या शिवसेना ( शिंदे गट) च्या शिल्पा धोत्रे यांच्यावर दणदणीत विजय मिळवला आहे. थेट नगराध्यक्षपदी वनश्री समीर शेडगे या विराजमान झाले आहेत.



रोहा अष्टमी नगर परिषदेवर पुन्हा एकदा राष्ट्रवादी ( अजित पवार गट )चा झेंडा फडकला असून खा. सुनील तटकरे, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आ. अनिकेत तटकरे यांच्या विकास कामाच्या बाजूने रोहेकाराने कौल दिल्याचे दिसून आले आहे.

नगराध्यक्ष शेडगे वनश्री समीर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विजयी झाल्या त्यांनी शिवसेना ( शिंदे गट) च्या शिल्पा धोत्रे यांच्यावर दणदणीत विजय मिळवला तर नगरसेवकपदी हजारे नीता कडू हजारे नीता ,कडू प्रशांत पानसरे फराह, जैन राजेंद्र, आफरीन अ.कादीर, मणेर अरबाझ अंबरे स्नेहा ,दर्जी अहमद मुमेरे आलमास अब्दुल,गुजर महेंद्र , बारटक्के गौरी, दिवेकर महेंद्र,धनावडे प्रियंका, चाळके रवींद्र, शिंदे संजना ,कोलाटकर महेश ,सौ पूर्वा मोहिते मोरे अजित जनार्दन हे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार विजयी झाले तर प्रभाग क्रमांक ९ जाधव सुप्रिया, शिवसेना आणि चाफेकर रोषन भाजप हे विजयी झाले

> ***आमच्यावर रोहेकरांनी विश्वास दाखवून प्रचंड मतांनी आमच्या उमेदवारांना विजयी केला आहे विकासाच्या मुद्द्यावर रोहेकाराने नेहमीच पाठिंबा देतात. पुन्हा एकदा आत्मविश्वास रोहेकरांनी दिला आहे. त्याबद्दल तमाम रोहेकर बंधू–भगिनींचे आभार मानतो सर्व यशस्वी उमेदवारांचे अभिनंदन करतो दुर्दैवाने दोन जागी पराभव पत्करावा लागाला आहे त्याचे आत्मपरीक्षण करू. अनिकेत, आदिती व शहराचे अध्यक्ष अमित उकडे यांच्या मार्गदर्शनाखाली अभूतपूर्व यश मिळाला आहे पुढील पाच वर्षाचा कालबद्ध कार्यक्रम आखून विकसित रोहा पहावयास मिळेल.***
>
> **–खासदार सुनील तटकरे, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष**

### बापाचे अपूर्ण राहिलेले स्वप्न लेकीने केले पूर्ण

रोहा नगरपरिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट पक्षाने सत्ता कायम राखली आहे. नगराध्यक्षपदी वनश्री समीर शेडगे यांनी ४६९५ इतक्या मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत त्यांचे वडील माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांचे नऊ वर्षांपूर्वी अपुरे राहिलेले स्वप्न पूर्ण केले.


## जाहीर नोटीस

**विषय:– उशिरा जन्म नोंद करणेबाबत.**

**संदर्भ :– अर्जदार श्री. दत्तात्रेय लक्ष्मण पाटील, यांचा दि. २४/१०/२०२५ रोजीचा अर्ज.**

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. दत्तात्रेय लक्ष्मण पाटील, रा.मु. दिघाटी, ता. पनवेल, जि. रायगड यांनी त्यांची मुलगीचा उशिरा जन्माचा नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक २३/०१/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर जन्म नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(जितेंद्र मा. इंगळे–पाटील)**
**अपर तहसीलदार पनवेल**


# माथेरान नगरपालिकेवर महायुतीचा झेंडा

**माथेरान : बातमीदार**

माथेरान नगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीचा निकाल दि.२१रोजी जाहीर झाला असून महायुतीचे एकूण १५ उमेदवार विजयी झाले आहेत.तसेच थेट नगराध्यक्ष पदाचे महायुतीचे उमेदवार चंद्रकांत चौधरी हे पण मोठ्या मताधिक्याने निवडून आले असून विरोधकांचा सुपडा साफ केला आहे.माथेरान मध्ये पुन्हा एकदा चंद्रकांत चौधरी यांचा करिष्मा चाललेला दिसत आहे.

माथेरान नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर रोजी पार पडली होती.यामध्ये महायुती विरुद्ध शिवराष्ट्र पॅनल अशी थेट लढत होती.यामध्ये महायुतीचे २०पैकी एकूण १५ उमेदवार विजयी झाले असून महायुतीचे थेट नगराध्यक्षपदाचे उमेदवार चंद्रकांत चौधरी यांनी शिवराष्ट्र पॅनलचे अजय सावंत यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव करीत आपला दणदणीत विजय संपादन केला आहे. माथेरानमधील जनतेने चंद्रकांत चौधरी यांच्यावर विश्वास दाखवला असून त्यांच्या १५ शिलेदारांना विजयी करीत माथेरान पालिकेवर महायुतीचा भगवा झेंडा फडकवला आहे. आमदार महेंद्र थोरवे यांनी सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन करीत त्यांना शुभेच्छा दिल्या.




## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५–२६ ते २०२९–३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम आज दि. २२/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नावः कोणार्क हेवन्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित चिभ्रंण, ता. पनवेल, जि. रायगड. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २३/१२/२०२५ ते २९/१२/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक ३०/१२/२०२५, नामनिर्देशन माघारी दि. ०१/०१/२०२६ ते १५/०१/२०२६ व आवश्यकतेनुसार मतदान दि. २५/०१/२०२६ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात, निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय, कोणार्क हेवन्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित चिध्रंण, ता. पनवेल, जि. रायगड. कार्यालयात पाहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी यांची नोंद घ्यावी.

**सही/–**
**संदेश नंदकुमार महाडीक**

निवडणूक निर्णय अधिकारी प्राधिकृत अधिकारी, कोकण विभाग पॅनल अ.क्र. वर्ग 'क '०६/'ई' ०९ कोणार्क हेवन्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या चिध्रंण, ता. पनवेल, जि. रायगड

# स्वच्छ हवेसाठी ज्येष्ठांसह तरुणाई एकवटली!

## वाशीत मानवी साखळीद्वारे आंदोलन; प्रशासनाला दिला संदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

१५ जानेवारीला होणाऱ्या महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, शनिवारी वाशी मिनी सी-शोअरवर जेन झी युवकांनी उभारलेल्या मानवी साखळीने वायुप्रदूषण आणि पर्यावरण संरक्षण हे मुद्दे थेट नागरी निवडणूक चर्चेच्या केंद्रस्थानी आणले. या उपक्रमातून उमेदवार आणि प्रशासनाला स्पष्ट संदेश देण्यात आला. स्वच्छ हवा हा विशेषाधिकार नाही, तर मूलभूत हक्क आहे अशा घोषणा देण्यात आल्या.




सेक्टर १०- ए येथील सागरी किनाऱ्यावर सकाळी ७ वाजल्यापासून जवळपास दोन तास ही शांत मानवी साखळी उभी होती. निवडणूक काळात अल्पकालीन आश्वासनांमुळे आणि पायाभूत सुविधांच्या चर्चेमुळे दुर्लक्षित राहणाऱ्या सार्वजनिक आरोग्याच्या मुद्द्याला पुन्हा केंद्रस्थानी आणण्याचा हा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले.

श्वास घेणे आरोग्यास घातक ठरत आहे आणि स्वच्छ हवेसाठी मतदान करा अशा फलकांसह युवकांनी खांद्याला खांदा लावत उभे राहत वाढत्या प्रदूषण संकटाकडे लक्ष वेधले. उर्वरी आणि नॅटकनेक्ट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आला असून, हा निषेध नसून नागरिकांच्या सामूहिक चिंतेचा शांत अभिव्यक्ती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी वायुप्रदूषण हा दुय्यम विषय राहता कामा नये, असे ठामपणे सांगितले. स्वच्छ हवा हा निवडणुकीचा मुद्दा झाला पाहिजे, असे सांगत त्यांनी मतदारांनी पर्यावरणाबाबत उमेदवारांना थेट प्रश्न विचारावेत, असे आवाहन केले.

या मानवी साखळीमुळे सकाळच्या फिरस्तीला आलेले नागरिक, धावपटू आणि ज्येष्ठ नागरिक थांबून पाहू लागले. आपण सगळेच या प्रदूषणाचे बळी आहोत, अशी प्रतिक्रिया एका स्थानिक नागरिकाने दिली.

कुमार यांनी शहरात ३-३-३०० नियमाची कठोर अंमलबजावणी करण्याची गरजही अधोरेखित केली. या शहरी नियोजन संकल्पनेनुसार प्रत्येक नागरिकाला घरातून किमान तीन झाडे दिसली पाहिजेत, ३०० मीटरच्या आत हिरवे क्षेत्र असावे आणि प्रत्येक परिसरात किमान ३० टक्के वृक्षछत्र (ट्री कॅनोपी) असावी.

नवी मुंबईतील विविध प्रदूषण स्त्रोतांकडेही सहभागींचे लक्ष होते-मोठ्या पुनर्विकास प्रकल्पांमधील बांधकामाची धूळ, बेजबाबदार खाणकाम, उरण-पनवेल रोडवरील आरएमसी प्रकल्पांची वाढ, तसेच काळा धूर सोडणारी जुनी अवजड वाहने.

उर्वरीच्या संचालक वसुधारा गुप्ते यांनी सांगितले की स्वयंसेवक बांधकामधूळ प्रदूषणावर लक्ष ठेवत असून, प्रदूषण नियंत्रण अधिकाऱ्यांना सातत्याने माहिती देत आहेत. जनमत तयार करण्यासाठी स्वाक्षरी मोहिमाही राबवण्यात येत आहे.

इंडियन वुमन सायंटिस्ट्स असोसिएशनच्या विनी संधू यांनीही या उपक्रमात सहभाग घेत शहरात हरित क्षेत्र वाढवण्याची गरज अधोरेखित केली आणि झाडांना नैसर्गिक ऑक्सिजन कारखाने असे संबोधले.

धूळ नियंत्रण आणि उत्सर्जन नियमांची कमकुवत अंमलबजावणी मुलांपासून वृद्धांपर्यंत आणि श्वसन विकार असलेल्या नागरिकांसाठी गंभीर आरोग्य धोके निर्माण करत असल्याचे उर्वरीच्या समन्वयक सिया गुप्ता यांनी सांगितले.

सागरकिनाऱ्यावर हातात हात घालून उभ्या राहिलेल्या युवकांनी निवडणुकांपूर्वी स्पष्ट इशारा दिला-स्वच्छ हवा आणि सार्वजनिक आरोग्य हे मूलभूत नागरी हक्क आहेत आणि जबाबदारी केवळ प्रशासनाची नव्हे तर निवडून आलेल्या प्रतिनिधींचीही आहे.

# आचारसंहिता उल्लंघनावर राहणार विशेष पथकांची काटेकोर नजर

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीची आदर्श आचारसंहिता १५ डिसेंबर रोजी राज्य निवडणूक आयोगामार्फत जाहीर झाली असून आचारसंहितेचे पालन होत असल्याबाबत निरीक्षण व नियंत्रण करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या संनियंत्रणाखाली आचारसंहिता कक्ष व त्या अंतर्गत विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत.



महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आठ निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये सुरु झाली असून त्या प्रत्येक कार्यालयासाठी पहिल्या टप्प्यात तीन आचारसंहिता पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. यामध्ये स्थिर सर्वेक्षण पथक, भरारी पथक व व्हिडीओ सर्व्हिलन्स पथक कार्यरत होत आहेत. यासोबतच प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र व्हिडीओ पाहणी पथकेही कार्यरत असणार आहेत.

या पथकांव्दारे मतदारांना लाच देणे, वस्तूंचे-पैशाचे-मद्याचे वाटप करणे अथवा इतर प्रलोभन दाखवणे, धाकदपटशा दाखविणे आदी आचारसंहितेचा भंग करणा-या बाबींवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. धार्मिक वा सामाजिक तणाव, प्रतिस्पर्धांवरील विपर्यास्त टिका, प्रार्थनास्थळांचा वापर, घोषणा व जाहीराती, कार्यक्रमांचे आयोजन अशा आचारसंहिता विषयक विविध बाबींवर या पथकांचे बारीक लक्ष असणार आहे तसेच त्याचे व्हिडीओ छायाचित्रीकरणदेखील करण्यात येणार आहे.

अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या सनियंत्रणाखाली मालमत्ताकर विभागाचे उपआयुक्त डॉ. अमोल पालवे या सनियंत्रण कामात समन्वय अधिकारी असणार आहेत. तसेच परिवहन उपक्रमाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तुषार दौंडकर हे आचारसंहितेच्या विविध पथकांचे समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

आदर्श आचारसंहिता ही निवडणूका शांततापूर्ण व नियमबध्द आचरणात व सभ्यतेत पार पाडण्यासाठी नैतिक नियमावली असून नागरिकांचा शांततेचा अधिकार अबाधित राखण्यासाठी आणि समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. याकरिता सर्वांनीच आदर्श आचारसंहितेचे पालन करावे, असे आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत नागरिकांना काही तक्रार वा सूचना करावयाची असल्यास नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने १८००२२२३०९ / १८००२२२३१० हे टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आले असून नागरिकांनी आवश्यकतेनुसार त्याचा वापर करावा व नवी मुंबई महानगरपालिकेस सहकार्य करावे असेही आवाहन करण्यात येत आहे. लवकरच विभाग कार्यालय पातळीवरही अशा प्रकारचे हेल्प डेस्क सुरू करण्यात येत आहेत.

# माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून होईल उत्कृष्टतेकडे वाटचाल -सुमित्रा भोसले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मॉडर्न स्कूल, वाशी येथे शनिवारी (दि.२०) माजी विद्यार्थ्यांशी पुन्हा नाते दृढ करण्याच्या आणि शाळा व माजी विद्यार्थी यांच्यातील संबंध अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने माजी विद्यार्थी मेळावा यशस्वीपणे आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या घंटानादाने झाली. त्यानंतर राष्ट्रगीत सादर करण्यात आले.



पुढे शिक्षकांनी सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यक्रमात उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमास शाळेच्या प्राचार्या सुमित्रा भोसले मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून माजी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत केले व त्यांना मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांचा शाळेच्या सर्वांगीण विकासात असलेला मोलाचा सहभाग त्यांनी अधोरेखित केला. त्यांच्या मार्गदर्शक विचारांचा सारांश पुढील शब्दांत मांडता येईल.

यानंतर माजी विद्यार्थी गणेश पाटील, प्रमोद वानवे, वंदेभारत भगत आणि वैजयंती पाटील यांनी आपल्या शालेय आठवणी, अनुभव व यशोगाथा विद्यार्थ्यांसमोर मांडल्या. त्यांनी आपल्या जीवनातील घडणीत मॉडर्न स्कूल व शिक्षकांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, हे स्पष्ट केले. त्यांच्या प्रेरणादायी भाषणांमुळे विद्यार्थ्यांना नवी दिशा व आत्मविश्वास मिळाला. हा माजी विद्यार्थी मेळावा अत्यंत उत्साहपूर्ण आणि संस्मरणीय वातावरणात झाला. शाळा व माजी विद्यार्थी यांच्यातील नाते अधिक दृढ झाले असून सामूहिक प्रगतीकडे वाटचाल करण्याचा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

# गायन स्पर्धेत तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे सुयश

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्था सातारा, कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत रायगड विभाग कामोठे यांनी बुधवारी (दि.१७) छत्रपती शिवाजी विद्यालय पळस्पे शाखेत घेतलेल्या गायन स्पर्धेत रायगड विभागातील अनेक शाखांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



यामध्ये तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे या विद्यालयात इयत्ता अकरावी सायन्स मध्ये शिकणारा कुमार नचिकेत सदानंद म्हात्रे या विद्यार्थ्याने मोठ्या गायन गटात द्वितीय क्रमांक पटकावला. आपल्या सुरेल आवाजात पद्मनाभना नारायण हे गीत गाऊन त्याने सर्वांना मंत्रमुग्ध केले. इयत्ता बारावी आर्ट्स मध्ये शिकणाऱ्या आदित्य पाटील या विद्यार्थ्याने त्याला तबल्याचीउत्तम साथ दिली.

रयत शिक्षण संस्था रायगड विभागाचे विभागीय अधिकारी एम. के.कोंगेरे यांनी नाचिकेतचा गौरव केला. विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे, उपप्राचार्या एस. डी.थोरात, पर्यवेक्षिका एस. एम.बाबर आणि एस. एस.पाटील त्याच प्रमाणे विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू व सर्व शिक्षकवृंदांनी नचिकेचे कौतुक केले. नचिकेत चे वडील विद्यालयाचे उपशिक्षक एस. डी. म्हात्रे त्याच प्रमाणे विद्यालयातील गायन विभाग प्रमुख उपशिक्षक एस.डी.नाईक आणि पी.ए पाटील यांचेदेखील प्राचार्यांनी कौतुक केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या निवासी शिबिराचा समारोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय योजना विभागातर्फे शांतीवन नेरे येथे आयोजित केलेल्या सात दिवसीय रहिवाशी शिबिराचा समारोप समारोह शनिवारी (दि.२०) करण्यात आला.

या समारोप सोहळ्यासाठी कुष्ठरोग निवारण समितीचे चेअरमन प्रमोद ठाकूर, तसेच चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील तसेच रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, डॉ. सानवी देशमुख प्राचार्या, बीसीटी लॉ कॉलेज न्यू पनवेल तसेच तिन्ही महाविद्यालयातील वेगवेगळ्या शाखांचे विभाग प्रमुख तसेच शांतीवन कुष्ठरोगी समिती नेरे येथील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी डॉ. रोशन पाटील उपस्थित होते तसेच त्यांच्या हस्ते तिन्ही महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. या सात दिवसीय रहिवाशी श्रम संस्कार शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातील तिने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये सहभागी घेतला त्यामध्ये स्वच्छता रॅली, श्रमदान, वेगवेगळे बौद्धिक सत्रे यांचा समावेश आहे.

या सात दिवसीय निवासी शिबिराचा राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदत झाली तसेच एक राष्ट्रीय स्वयंसेवक म्हणून राष्ट्र उभारणीसाठी असणाऱ्या जबाबदाऱ्या ज्ञात झाल्या. या वेळी चांगू काना ठाकूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे चेअरमन प्रा. डॉ. राजेश येवले यांच्या मार्गदर्शनात हे सात दिवसीय रहिवासी श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. प्रा. आकाश पाटील (मुख्य कार्यक्रम अधिकारी चांगु काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल) यांनी सात दिवसीय रहिवासी श्रमसंस्कार शिबिराचा अहवाल सादर केला.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार श्री प्रशांत ठाकूर, संस्थेचे कार्यकारी संचालक परेशशेठ ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी या सात दिवशीय निवासी श्रम संस्कार शिबिराचे आयोजन केल्याबद्दल तिन्ही महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थी व कार्यक्रम अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रा. प्रथमेश ठाकूर (मुख्य कार्यक्रमाधिकारी, रामशेठ ठाकूर कॉलेज खारघर व प्रा. संग्राम पवार (मुख्य कार्यक्रम अधिकारी बीसीटी लॉ कॉलेज न्यू पनवेल), तिन्ही महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रमाधिकारीही उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा घाडगे हिने केले व कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. आलोक भानुशाली (कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना विभाग सांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल) यांनी सर्वांचे आभार मानले.



# महाबोधी महाविहार मुक्ती अभियान सभा



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सकल बौद्ध समाज, सम्राट अशोक महाविहार सह नवी मुंबईतील विविध बौद्ध धार्मिक संस्था आणि संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्ध लिखो! पाली भाषा लिखो! महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या या मागणीसाठी जनजागृती सभेचे आयोजन पूज्य भदंत ज्ञानज्योती महाथेरो (चंद्रपूर) यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. डॉ.जी.के डोंगरगावकर यांच्या पुढाकारणे नुकतेच रमाबाई आंबेडकर नगर, सेक्टर-८, सीबीडी येथे करण्यात आले होते.

या सभेत बोधिगया अभियानाची आवश्यकता व पार्श्वभूमी भन्ते प्रज्ञानंद यांनी विशद केली. प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी सांगितले की, धर्मांतराला ६९ वर्षे झाली तरी हिंदू धर्माचा त्याग केलेले अनेक बौद्ध नागरिक जनगणना सर्वेक्षणात स्वतःची नोंद बौद्ध धर्मीय म्हणून करीत नाहीत तर जनगणना आयोगदेखील बौद्धांच्या अचूक नोंदी करीत नाही.

या वेळी माजी नगरसेवक अशोक गुरखे, सुरेखा नरबागे, डॉ. जयाजी नाथ, नवी मुंबई जिल्हा काँग्रेस समिती अध्यक्ष रामचंद्र (आबा) दळवी, आशाताई शिंदे, रत्नमाला डोंगरगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

भिक्खू संघाची पदयात्रा सिबिडी बेलापूर परिसरातून काढण्यात आली. अभिवादन सभेत बौद्ध भन्तेना चीवर, अन्नदान, भारताचे संविधान आणि बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. सर्वश्री सचिन आव्हाड, सुनील रसनभैरे, प्रा. बी. बी. पवार, ॲड. अनिल बागुल, ॲड. राजरत्न डोंगरगावकर, प्रा. सतीश पवार, प्रा. बी. बी. शिंदे, भगवान कांबळे, नारायण वाघमारे आदींनी या वेळी मोलाचे सहकार्य केले.

दरम्यान, २६ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या बौद्ध लिखो! पाली भाषा लिखो ! संविधान घरोघरी अभियानाची अंमलबजावणी नवी मुंबईतील १४ नोड सुरू असून महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या, आमदार-खासदारांनी स्थानिक विकास निधीतून आपल्या मतदारसंघातील प्रत्येक कुटुंबाला भारताचे संविधान मोफत वाटप करावे, असे ठराव या सभेत पारित करण्यात आले.

# पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो २०२५चे आयोजन

**पनवेल : वार्ताहर**

दिशा बहुउद्देशीय सेवा संस्थेच अध्यक्ष सुनिल काशिनाथ कटेकर यांनी पुढाकार घेवून पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो २०२५ चे आयोजन केले असल्याची माहिती काळभैरव मंदिर, आर ३, चिंचपाडा येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिले.

या पत्रकार परिषेदेला बांधकाम व्यवसायिक अनिल सिंघवी, नागेश सुरवसे, सुनील कटेकर, संतोष सुतार आदी उपस्थित होते. पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो २०२५ हे २२ ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान रोटरी पनवेल फेस्टिव्हल, कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, पनवेल येथे करण्यात आले असून पुष्पक नगर हे आगामी काळात सर्वाधिक गतिमान आणि प्रतिष्ठित ठिकाण म्हणून ओळख होणार असून जास्तीत जास्त लोकांनी येथे आपली घरे घ्यावीत यासाठी पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो २०२५चे आयोजन केले असल्याची माहिती सुनील काशिनाथ कटेकर यांनी दिली.

आगामी काळात सिडकोसह इतर शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून या भागाचा विकास होणार आहे. विमानतळापासून हाकेच्या अंतरावर हे नगर असल्याने लोकांना याठिकाणी राहण्यास आवडणार आहे. या भागातील प्रकल्पग्रस्त बांधकाम व्यवसायिक याना बरोबर घेऊन हे पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो २०२५चे आयोजन केल्याची माहिती अनिल सिंघवी यांनी दिली.

पनवेलवासीय व नवी मुंबई परिसरातील नागरिकांनी या प्रॉपर्टी एक्सपो २०२५मध्ये सहभाग घेवा, असे आवाहन संतोष सुतार यांनी केले आहे.

# आवरे येथील प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे कॉलेजमध्ये कविसंमेलन

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील आवरे येथिलज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स - आवरे येथे कोकण मराठी साहित्य परिषद आयोजित कवी संमेलन मोठया उत्साहात संपन्न झाले या कवी संमेलनात माजी प्राचार्य आर.के.म्हात्रे यांनी शिक्षण आणि आपली ध्येये या विषयावर मार्गदर्शन केले. जीवन सुखी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी आपल्या समोर ध्येय ठेवायला हवीत, असे विचार मांडले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहितिक प्रा. एल.बी.पाटील होते.

येथे झालेल्या कोमसापच्या कविसंमेलनात कवयित्री अक्षता गोसावी यांनी कोलाहल मनातला कविता सादर करून सर्वांची मने जिकली. लवेंद्र मोकल यांनी दारूबंदी, संजीव पाटील यांनी आगरी पित्रा, रामचंद्र म्हात्रे यांनी जय जय उरण माझा या कविता सादर केल्या तसेच प्रेमकाव्य, निसर्गकाव्य, भावकाव्य, विडंबनकाव्य इत्यादी प्रकारच्या कविता उत्स्पूर्त सादर केल्या.

कार्यक्रमात केशव म्हात्रे, संजय केणी, प्रा.प्रविण चिर्लेकर,शिवप्रताप पंडित, नरेश पाटील, रंजना केणी आणि साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील यांनी दर्जेदार कविता सादर करून रसिकांना मनसोक्त आनंद दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.रंजना जोशी केणी आणि प्रा.प्रविण चिर्लेकर यांनी केले. कवी संमेलन यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर, शिक्षक शिक्षकेतर कर्मचार्यानी परिश्रम घेतले. आभार प्रा.रोहिणी गोरे यांनी मानले.



# निजामपूर एसटी स्थानकात जागेचा अभाव

## बसेस थांबा घेत नसल्याने प्रवाशांमध्ये संताप

**माणगाव : बातमीदार**

निजामपूर शहरातुन पुण्याकडे तसेच श्रीवर्धन, दिवेआगर, खेड, मंडणगड अशा एसटी फेऱ्या सुरू असुन अंदाजे ५०च्या आसपास एसटी फेऱ्या दररोज सुरु आहेत, परंतु एसटी स्थानकाची जागा अपुरी असल्याने पुणे परिसरातील एसटी आगारांच्या बसेस निजामपूरमध्ये थांबा घेत नाहीत.



मेन हायवेला लागूनच एसटी स्थानक (थांबा) असल्याने एखादी एसटी प्रवासी उतरवण्यासाठी थांबली तर वाहनांची प्रचंड मोठी रांग लागते व ट्रॅफिक जाम होते. त्यामुळे प्रवासी संतापले आहेत. पुणे येथुन घाटमाथ्यावरून कोंडेथर घाट मार्गे (ताम्हणी) खाली कोकणात प्रवेश करताच निजामपूर शहर लागते. निजामपूर हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने मोठ्या प्रमाणात प्रवासी या स्थानकात एसटीची वाट पाहत असतात, परंतु एसटी थांबवण्यासाठी अपुरी जागा व मेन हायवेवरच उभी करावी लागत असल्याने वाहक चालक ईथे थांबा नाही असे सांगुन प्रवाशांना व पास धारी विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारत आहेत.

असाच प्रकार शालेय विद्यार्थ्यांच्या बाबतीत घडला असुन एसटीचा सवलतीचा पास असुनदेखील एसटी न थांबल्याने विद्यर्थ्यांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. गोर गरिब जनतेला एसटीचा एकमेव आधार असल्याने या गंभीर प्रश्नाकडे संबंधित प्रशासनाने लक्ष घालावे.

सद्यस्थितीत असणारा एसटी स्थानकाला जागा अपुरी पडत आहे तर याला उपाय म्हणून एसटी स्थानकाला जिथे जागा मिळेल तीथे हलवुन प्रवाशांना होणारा त्रास कमी करावा. तसेच स्थानकात प्रवाशांसाठी सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था करावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

प्रशासनाने प्रवाश्यांच्या या समस्येकडे वेळीच लक्ष देऊन समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करावे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

# मोरबाई मंदिर परिसराला पर्यटन दर्जा मिळवून देणार -खासदार सुनील तटकरे



**मुरूड : प्रतिनिधी**

नितांत सुंदर मोरे गावात टेकडीवर वसलेले मोरबाई मंदीर तसेच मंदीरावरून ऐतिहासिक पदमदुर्ग किल्ल्याचे घडणारे दर्शन नयनरम्य आहे या समुद्रालगतच्या संपूर्ण परिसराला येत्या तीन महिन्यात क वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त करून देणार अशी ग्वाही रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी दिली.

विहूर ग्रामपंचायत हद्दीत मोरे गावात असणारा जीर्ण पूल नवीन बांधण्यात यावा अशी ग्रामस्थांनी मागणी केली होती. ग्रामस्थांच्या मागणी खातर सुमारे २८ लाखाचा निधी खासदार तटकरे यांनी उपलब्ध करून दिला होता. त्या पुलाचे काम पूर्ण झाले सदरचा पूल वाहतुकीसाठी मोकळा करण्यासाठी या पुलाच्या लोकार्पणसाठी खासदार तटकरे मोरे गावात आले होते.

मुरुड तालुक्यातील विहूर ग्रामपंचायत अंतर्गत मोरे गावातील रस्त्यावर बांधण्यात आलेल्या पुलाचे उद्घाटन खासदार तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ते ग्रामस्यांशी संवाद साधताना बोलत होते. या वेळी व्यासपीठावर खासदार सुनील तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन मनोज भगत, जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दांडेकर, माजी सरपंच अजित कासार, माजी सभापती स्मीता खेडेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक, माजी नगरसेवक विश्वास चव्हाण, रायगड जिल्ह्याचे सोशल मीडिया सेलचे उपाध्यक्ष हसमुख जैन, सचिव विजय पैर, महिला तालुका अध्यक्षा ॲड मृणाल खोत, आगरदांडा सरपंच आशिष हेदुलकर, अनुराधा दांडेकर, दत्तात्रेय नात्ती, गणेश नाकती व कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी मोरे ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष दत्तात्रय नात्ती यांच्या हस्ते खासदार तटकरे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणात तटकरे पुढे म्हणाले की, मोरबाई मंदिर परिसर विकसित करताना वन विभागाचा प्रश्न उदभवला तर तोही निश्चितपणे सोडवून भविष्याच्या काळात भाविकांचा व पर्यटकांचा ओघ वाढवण्यासाठी मुलभूत सुविधा देण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी पक्षाच्या घोष वाक्या नुसार जनतेसाठी हितासाठी काम करत आलो आणि कर्तव्य भावनेने काम करतच राहणार तथापि गावकी भावकी वा अटी शर्ती स्टँप पेपर वर न लिहून घेता करणार अशी हमी देत कागदाचा कपटा ही लिहून घेणार नाही. जनतेवर विश्वास असला पाहिजे. जनतेच्या हृदय सिंहासनावर कोरले जाईल अशीच भूमिका आपली राहील असे संकेत दिले.

# शेकाप नेते अस्लम राऊत यांचा समर्थकांसह राष्ट्रवादीमध्ये प्रवेश



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मोर्बा येथे शेकाप नेते रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक अस्लम राऊत यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनिल तटकरे, महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

या पक्षप्रवेशात अस्लम राऊत यांच्यासमवेत मोर्बा राऊत मोहल्ला, बौध्दवाडी, बोर्ले गाव, मराठा आळी, मस्जिद मोहल्ला, धनसे मोहल्ला, वरचा मोहल्ला, देगाव ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच व सदस्य, शिरवली, शिरवली आदिवासी वाडी, निळगुण, निळगुण आदिवासीवाडी, नाईटणे, पुरार, मोर्बा पवारवाडी, डोंगर आळी, बोर्ले बौध्दवाडी, भीमनगर, महादपोली आदिवासीवाडी, डोंगरोली, डोंगरोली बौद्धवाडी,रिळे, तारणे, कुमशेत, देगाव आदिवासीवाडी, या गावातील विविध आजी माजी सरपंच उपसरपंच, सदस्य आणि अस्लम राऊत समर्थक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

या वेळी व्यासपीठावर खासदार सुनिल तटकरे, ना. आदिती तटकरे यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस राज्याचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप, जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, विनोद पाशिलकर, सुरेश मोरे, समीर बनकर, नाना भऊड, ज्येष्ठ नेते महादेव बक्कम, शेखर देशमुख, तालुका अध्यक्ष बाळाराम (काका) नवगणे, श्रीवर्धन विधानसभा अल्पसंख्याक सेल अध्यक्ष अल्ताफ धनसे, महिला तालुकाध्यक्ष संगिता बक्कम, मुख्तार वेळासकर, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर, राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष शादाब गैबी, ज्येष्ठ नेते महादेव बक्कम, तालुका उपाध्यक्ष राजू मोरे, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, मा. पं. स. स. शैलेश भोनकर, भुवन सरपंच दिपक जाधव, हुसेन रहाटविलकर, खरवली सरपंच संतोष खडतर, वारक सरपंच वैष्णव साठे, गोरेगाव सरपंच जुबेर अब्बासी, माजी उपरपंच इकबाल हर्णेकर व राष्ट्रवादी काँग्रेसचे विविध सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवीन स्वप्न, उद्दिष्ट ठरवा आणि यश मिळवा -डॉ. श्रुती गोडबोले

**कर्जत : प्रतिनिधी**

आपली पहिली गुरु आपली आई, त्यानंतर शिक्षक आणि पुस्तके गुरु असतात. सर्वात मोठे गुरु आपले जीवन आहे आणि अनुभव हे आपले शिक्षक आहेत. नवीन स्वप्न आणि उद्दीष्ट ठरावा व यश मिळवा, असा महत्त्वपूर्ण सल्ला सामाजिक कार्यकर्त्या डॉ. श्रुती गोडबोले यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कर्जतमधील महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर शाळेच्या दोन दिवसांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन शाळेच्या प्रांगणात करण्यात आले होते. प्रमुख पाहुण्या डॉ. श्रुती गोडबोले यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून स्नेहसंमेलनाचे उदघाट्न करण्यात आले. या वेळी योगेश गोडबोल, महिला मंडळाच्या अध्यक्ष उषा भट, कार्याध्यक्ष मीना प्रभावळकर, उपाध्यक्ष वैदेही पुरोहित, मुख्याध्यापिका स्नेहा गाढे आदी उपस्थित होते.

कार्याध्यक्ष प्रभावळकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात शाळेचा चढता आलेख सादर केला. पाहुण्यांचा परिचय सुप्रिया भासे यांनी करून दिला. त्यानंतर दहावी शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पहिल्या पाच विद्यार्थ्यांचा तसेच विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व शिक्षीकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी नृत्य, गीते सादर करून आपली कला प्रदर्शीत केली. दुसऱ्या दिवशी वास्तुविशरद राहुल अगज, विजया हांडे या प्रमुख म्हणून उपस्थित होत्या. या प्रमुख पाहुण्यांनी, विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी चे महत्व तसेच पालकांना व शिक्षकांना त्यांना घडविण्यासाठीचे मार्गदर्शन करण्यासाठी प्रेरित केले. त्यानंतर मान्यवरांच्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. सूत्रसंचालन श्रद्धा मुंढेकर तर आभारप्रदर्शन स्नेहा गाढे यांनी केले.

या वेळी डॉ. माधवी ठाकूर देसाई, संगीता गोडबोले, माणिक हरपुडे, सरिता मंडावळे, पूजा सुळे, प्रेमा पितळे, मेघा पिंगळे आरती कोकरे, माधुरी देशमुख, वृषाली माळी, शारदा राठोड, सुषमा सुपे, सारिका देशमुख, अर्चना भुसाळ, सुमिता अहिरराव, दया मोडक, प्रियांका शिंदे आदी उपस्थित होते.



# बाळसई येथे आजपासून अखंड हरिनाम सप्ताह

**नागोठणे : बातमीदार**

संपूर्ण रोहा तालुक्यातील नागोठणे जवळील बाळसई गावामध्ये अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे सोमवार २२ ते गुरुवार २५ डिसेंबर २०२५ असे चार दिवसांचे आयोजन करण्यात आले आहे.

परमपुज्य स्वानंद सुखनिवासी गुरुवर्य गणपतबाबा अलिबागकर महाराज व परमपूज्य स्वानंद सुखनिवासी गुरुवर्य धोंडुबाबा कोल्हटकर, व स्वानंद सुखनिवासी गुरुवर्य गोपाळ महाराज वाजे तसेच गुरूवर्य पुरुषोत्तम महाराज पाटील (बापु) यांच्या कृपाशीर्वादाने तसेच ग्रामस्थ मंडळ बाळसई यांच्या सौजन्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या चार दिवसांमध्ये दररोज काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायणाचे वाचन, प्रवचन, हरिपाठ, किर्तन, असे कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमामध्ये कळशपुजन , ध्वजारोहण व मधुकर गणपत ठमके यांच्या हस्ते तसेच सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. त्याचप्रमाणे सोमवार (दि.२२) रोजी ह. भ.प. दत्ताराम महाराज नावले (बाळसई) यांचे प्रवचन तर ह.भ.प. गजानन महाराज बळकावडे (आमडोशी) यांची किर्तनसेवा होईल. तसेच मंगळवार (दि.२३) रोजी ह.भ.प.नरेश महाराज जाधव (जांबोशी) यांचे प्रवचन तर ह.भ.प.नित्यांनंद महाराज मांडवकर (चणेरे) यांचे किर्तन होईल. बुधवार (दि. २४) रोजी ह. भ.प. दिनेश महाराज कडव ( वांदोली) यांचे प्रवचन तसेच ह.भ प. बाळासाहेब महाराज गतिर (मुंढेगाव- नाशिक) यांची किर्तनसेवा होईल . त्याचप्रमाणे गुरुवार (दि.२५) रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह. भ.प. नानाजी महाराज शिरसे (तामसोली) यांचे काल्याचे किर्तन झाल्यानंतर संपूर्ण बाळसई गावातुन श्रींची पालखीतुन भव्य मिरवणुक काढण्यात येईल.

यानंतर या पालखी सोहळ्यासाठी उपस्थित असलेल्या सर्व भाविकांना महाप्रसाद देऊन या भव्यदिव्य कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे. हा अखंड हरिनाम सप्ताह सोहोळा साजरा करण्यासाठी बाळसई गावचे अध्यक्ष मधुकर ठमके यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, श्री. बेलजाई मित्र मंडळ, तसेच मुंबई मित्र मंडळ मेहनत घेत आहेत.

# विजयभूमी विद्यापीठात एक भारत हम भारत उपक्रम



**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील विजयभूमी विद्यापीठात 'एक भारत हम भारत' उपक्रमांतर्गत, मैत्रेय दादाश्रीजी यांच्या प्रेरणेतून प्रथमच भारत युवा कॉन्क्लेव्हचे भव्य आयोजन करण्यात आले होते. विजयभूमी विद्यापीठाच्या सहकार्याने पार पडलेल्या या कॉन्क्लेव्हमध्ये रायगड जिल्ह्यातील आठ शाळा व महाविद्यालयांमधील १२० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता.

कॉन्क्लेव्हची सुरुवात 'राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका' या विषयावरील प्रभावी पॅनल चर्चेने झाली. त्यानंतर 'एक भारत हम भारत' या उपक्रमाचा प्रेरणादायी प्रवास उपस्थितांसमोर मांडण्यात आला. पहलगाम येथून सुरू झालेल्या श्रद्धांजली यात्रेपासून १८ राज्ये व ६१ शहरांपर्यंत पोहोचलेल्या या उपक्रमाने राष्ट्रीय एकतेचा ठाम संदेश दिला.

'जे करता ते प्रेमाने करा आणि जे प्रेमाने करता ते राष्ट्रासाठी करा' या संकल्पनेवर आधारित विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), संगीत आणि मृत्तिकाकला (क्ले मॉडेलिंग) यांवरील प्रत्यक्ष कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमादरम्यान मानवी साखळी रचून एक भारत, अखंड भारतासाठी सदैव कटिबद्ध राहण्याची शपथ घेण्यात आली. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी दर महिन्याला किमान एक तास राष्ट्रहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. उपक्रमाचा समारोप विद्यार्थ्यांच्या सादरीकरण व गौरव समारंभाने झाला. याप्रसंगी विजयभूमी विद्यापीठ अध्यक्ष डॉ. संजय पाडोदे, संचालिका कल्पना पाडोदे, एक भारत हम भारतच्या अनुराधा गोखले, डॉ. कुंती नागवेकर, डॉ. हेमंत तडसरकर, योगेश्वर सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# ओंबळी येथे आपत्ती निवारा शेड उभारणीच्या कामाचा शुभारंभ

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील ओंबळी गावात आपत्ती निवारा शेडच्या कामाचा भूमिपूजन व शुभारंभ मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.



या वेळी मंत्री भरत गोगावले, जिल्हा सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, उद्योजक रामदास कळंबे, तालुका प्रमुख निलेश अहिरे, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, सतीश शिंदे आदी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी ओंबळीतील मुंबई, पुणे व ठाणे येथील चाकरमानी मंडळी तसेच स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आपत्ती निवारा शेडमुळे ओंबळी गावासह परिसरातील ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. या भागात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने अतिवृष्टीच्या काळात व संभाव्य दुर्घटनांच्या वेळी नागरिकांना सुरक्षित आश्रय मिळावा, या उद्देशाने ही महत्त्वाची सुविधा उभारण्यात येत आहे. या कामांसाठी कोट्यवधी रुपये अंदाजित खर्च होणार आहे.

या वेळी मंत्री गोगावले यांनी, ग्रामस्थांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. आपत्तीच्या काळात नागरिकांचे जिवित तसेच मालमत्तेची हानी टाळण्यासाठी अशा निवारा शेडची नितांत गरज असून, हा प्रकल्प आपत्तीकाळात लोकहितासाठी महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. ओबळीवासियांनी मंत्री गोगावले यांच्या पाठीशी ठाम राहण्याची ग्वाही या वेळी उपस्थितांना दिली.

# उणेगाव जि.प.शाळेत माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद उत्कृष्ट शाळा, उणेगाव येथे 'माजी विद्यार्थी स्नेहमेळावा' मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्यासाठी गोरेगाव बिटाचे विस्तार अधिकारी कुमार खामकर सर, केंद्र प्रमुख शंकर शिंदे सर आणि गजानन देवकर सर उपस्थित होते. त्यांनी माजी विद्यार्थ्यांच्या कर्तव्य आणि जबाबदारीवर प्रकाश टाकला. शाळेला प्रगतीच्या शिखरावर नेण्यासाठी मुंबईकर आणि ग्रामस्थांची संयुक्त सभा घेऊन विविध प्रश्न मार्गी लावण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

शाळेच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी शंकर शिंदे सर, श्रीपत सत्वे, मंगेश शिंदे आणि वासुदेव सत्वे यांनी आर्थिक योगदान दिले. तसेच, शाळेचे जीर्ण रजिस्टर अद्यायावत करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन जेष्ठ मार्गदर्शक शंकर शिंदे आणि विकासदादा सत्वे यांनी दिले.

शाळेच्या भविष्यातील विकासासाठी या वेळी 'माजी विद्यार्थी संघा'ची अधिकृत कमिटी स्थापन करण्यात आली. अध्यक्ष शंकर शिंदे सर,उपाध्यक्ष गजानन देवकर सर, कोषाध्यक्ष विठोबा सत्वे सर,सल्लागार-शंकर शिंदे व विकास सत्वे, सदस्य-संजय सत्वे आणि संतोष शिंदे यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमासाठी शंकर शिंदे, विकास सत्वे, वासुदेव सत्वे,नारायण चेरफळे, गणपत सत्वे, सचिन सत्वे, स्मरणिका जुमारे, अरविंद सत्वे, श्रीपत सत्वे, भगवान शिंदे, महेश शिंदे, महादेव महाडिक, मंगेश शिंदे मंगेश सत्वे, निलेश शिंदे, नारायण शिंदे, संजिवनी शिंदे, कविता चेरफळे, इंदू सत्वे हायस्कूलचे विद्यार्थी आणि विठोबा सत्वे आदी उपस्थित होते.

# बेलघर येथे लोकसहभागातून वनराई बंधारा

**तळा : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत तळा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द येथील बेलघर येथे ग्रामस्थांनी लोकसहभागातून वनराई बंधारा बांधला.

पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन आहे. वाढती लोकसंख्या, बदलते हवामान आणि अनियंत्रित पाणीवापर यांमुळे आज अनेक भागांत पाण्याची तीव्र टंचाई जाणवते. या समस्येवर प्रभावी व पर्यावरणपूरक उपाय म्हणून वनराई बंधारा ही संकल्पना महत्त्वाची ठरते.

वनराई बंधारा म्हणजे नदी, ओढा किंवा नाल्यावर कमी खर्चात उभारला जाणारा लघु बंधारा. हा बंधारा प्रामुख्याने माती, दगड, वाळू, सिमेंटच्या गोण्या किंवा स्थानिक उपलब्ध साहित्य वापरून तयार केला जातो. लोकसहभागातून उभारले जाणारे हे बंधारे आहेत.

वनराई बंधाऱ्यांचे अनेक फायदे आहेत. प्रथम, भूजलपातळी वाढते, त्यामुळे विहिरी, बोअरवेल आणि हातपंपांना वर्षभर पाणी मिळते. दुसरे म्हणजे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढते, परिणामी पीक उत्पादनात सुधारणा होते. तिसरे, मृदाक्षय (माती धूप) कमी होतो आणि परिसरातील हरित आवरण वाढते. चौथे, दुष्काळी परिस्थितीत गावांना दिलासा मिळतो.

या बंधाऱ्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लोकसहभाग. गावकरी एकत्र येऊन श्रमदान करतात, नियोजन करतात आणि बंधाऱ्याची देखभालही करतात. त्यामुळे सामूहिक जबाबदारीची भावना निर्माण होते. वनराई बंधारा हा कमी खर्चाचा, टिकाऊ आणि पर्यावरणस्नेही उपाय असून तो स्थानिक पातळीवर पाणीप्रश्न सोडविण्यास प्रभावी ठरतो. पाण्याचे संवर्धन ही काळाची गरज आहे. वनराई बंधाऱ्यासारख्या उपक्रमांतून जलसंधारण साध्य करून आपण निसर्गाचे संतुलन राखू शकतो आणि भावी पिढ्यांसाठी पाण्याची सुरक्षितता सुनिश्चित करू शकतो.



# रन फॉर डिफरंटली एबल चाइल्ड एज्युकेशन!

## मॅरेथॉनला प्रतिसाद; आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ





**कामोठे : रामप्रहर वृत्त**

हम फिट तो इंडिया फीट या घोषवाक्याप्रमाणे स्वत:सह आपला परिवारदेखील आरोग्यमय आणि निरोगी राहील हा संकल्प नवीन वर्षात करा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामोठे येथे छाबा फाऊंडेशनच्या वतीने आयोजित मॅरेथॉन स्पर्धेच्या शुभारंभावेळी केले.

दिव्यांग मुलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि मदतीचा हात पुढे करण्यासाठी छाबा फाऊंडेशनच्या वतीने कामोठे येथे रविवारी (दि. २१) रन फॉर डिफरंटली एबल चाइल्ड एज्युकेशन या मॅरेथॉन स्पर्धेचे शानदार आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला कामोठे परिसरातील नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

मॅरेथॉनचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाला. कामोठे सेक्टर ६ येथील रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलपासून या स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण सुप्रसिद्ध अभिनेते राजीव भारद्वाज ठरले, ज्यांच्या उपस्थितीने धावपटूंमध्ये नवा उत्साह संचारला.

या स्पर्धेवेळी भाजप कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, जिल्हा चिटणीस विद्या तामखडे, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, भाजप नेते रवींद्र जोशी, सुशील शर्मा, भाऊ भगत, प्रदीप भगत, हॅप्पी सिंग, हरजिंदर कौर, जितेंद्र तिवारी, रवी गोवारी, छाबा फाऊंडेशनचे दामोदर चव्हाण यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते. स्पर्धेत मुलांपासून ते तरुणांपर्यंत सर्वच स्तरातील नागरिक सहभागी झाल्याने कामोठ्यात सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले.

### आगरी सेवा संघाची कबड्डी स्पर्धा

## श्री साई क्लब, आदर्श मंडळ, भवानी माता, माऊली स्पोर्ट्स संघ उपांत्य फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

श्री साई क्लब, आदर्श मंडळ, भवानी माता, माऊली स्पोर्ट्स यांनी आगरी सेवा संघाच्या कबड्डी स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. प्रभादेवी येथील राजाराम साळवी उद्यानातील स्व. दि.बा. पाटील क्रीडानगरीत स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी श्री साई क्लबने हिंद केसरी मंडळावर ३८-२५ अशी मात करीत उपांत्य फेरी गाठली.

जोरदार सुरुवात करीत पूर्वार्धात दोन लोण देत साईने २२-६ अशी मजबूत आघाडी घेतली, ती अनिकेत घाडगेच्या चतुरस्त्र खेळाच्या जोरावर. उत्तरार्धात मात्र हिंद केसरीच्या प्रसाद काटकरने जोरदार प्रतिकार करीत सामना रंगतदार स्थितीत नेला, पण संघाला विजयासमीप नेण्यास तो कमी पडला. दुसऱ्या सामन्यात सागर काष्टे याच्या भन्नाट खेळामुळे माऊली स्पोर्ट्स क्लबने सूर्यकांत मंडळाचा ३८-१४ असा एकतर्फी पराभव केला.



आदर्श मंडळाने श्री गणेश मंडळावर ३९-१९ अशी मात केली. मध्यंतराला १९-१० अशी आदर्शकडे आघाडी होती. पूर्वार्धात एक व उत्तरार्धात एक असे दोन लोण देत त्यांनी आपला विजय निश्चित केला. सुशील वाडकर आदर्शकडून, तर रोहित मोरे श्री गणेश संघाकडून उत्कृष्ट खेळले.

शेवटच्या सामन्यात भवानी माता प्रतिष्ठानने बारादेवी मंडळाचा प्रतिकार २५-२० असा मोडून काढत आगेकूच केली. पहिला लोण देत भवानी माताने विश्रांतीला १५-०७ अशी आघाडी घेतली.

# एक धाव मतदानासाठी! महिलांच्या मॅरेथॉनला पनवेलमध्ये प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृतीसाठी एक धाव मतदानासाठी या संकल्पनेवर आधारित महिलांची मॅरेथॉन रविवारी (दि. २१) पनवेलच्या वडाळे तलाव येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धे ला महिलांचा प्रतिसाद लाभला.

लोकशाही बळकट करण्यासाठी महिलांचा सक्रिय सहभाग वाढावा, मतदानाबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार मतदान जनजागृतीसाठी महापालिकेच्या वतीने स्वीप कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या मॅरेथॉनला वडाळे तलाव परिसरातून सकाळी ६ वाजता सुरुवात झाली. ही मॅरेथॉन ३ आणि ५ किमी अशा दोन गटांमध्ये घेण्यात आली. शहरातील तसेच परिसरातील विविध वयोगटातील महिलांनी उत्स्फूर्तपणे स्पर्धेत सहभागी नोंदविला.

स्वीप अंतर्गत घेण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत स्पर्धेच्या ठिकाणी महापालिकेच्या वतीने खास आकर्षक सेल्फी पॉईंटची सुविधा करण्यात आली होती. मतदान जनजागृतीसाठी बनविण्यात आलेला खास मास्कॉट या सेल्फी पॉईंटवर ठेवण्यात आला होता.

मॅरेथॉन यशस्वीपणे पूर्ण केलेल्या महिलांना महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्यासह रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे, प्रेसिडेंट अनिल ठकेकर आदी मान्यवरांच्या यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.








**पेण :** येथील नगर परिषदेच्या निवडणुकीत महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रितम ललित पाटील (भाजप) मोठ्या मताधिक्क्याने विजयी झाल्या आहेत, तर सदस्यपदाच्या एकूण २४पैकी महायुतीचे १७ उमेदवार (सहा बिनविरोध) विजयी झाले आहेत. विजयी उमेदवारांची रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत आमदार रविशेठ पाटील, नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्यासह विजयी उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.











**उरण :** येथील नगर परिषदेच्या निवडणुकीत सदस्यपदाच्या एकूण २१ पैकी सर्वाधिक १२ जागी भाजप महायुतीने विजय साकारत बहुमत मिळविले. या विजयी उमेदवारांचे आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com